RNI NO. MAHMAR/2020/84035




कायदेविषयक मार्गदर्शन मोफत

संपर्क
अँड . शालिनी सवाने
मो नं 8766507294



BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

रविवार, ११ जानेवारी २०२६ | वर्ष : ६ | अंक : १७ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 11 January 2026 | Year : 6 | Issue : 17 | Daily | Rate: Rs. 5/-


दि.11 जानेवारी 2026

1950 शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची मुंबई,परळ येथे प्रचंड सभा व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण तसेच बाबासाहेबांचा सत्कार व सिध्दार्थ कॉलेज मुंबई येथील विद्यार्थी संसदे समोर भाषण.



लालबहादूर शास्त्री यांचा स्मृतिदिन.

### मोदी सरकारविरोधात लिखाण करणे भोवले

## मुंबईत येताच डॉ. संग्राम पाटील पोलिसांच्या ताब्यात

**मुंबई :** लंडनमध्ये राहणारे अनिवासी भारतीय डॉक्टर संग्राम पाटील यांना मुंबई पोलिसांनी विमानतळावरून ताब्यात घेतले. पहाटे लंडनहून मुंबईत आल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. मोदी सरकारच्या धोरणांविरोधात सातत्याने टीकात्मक लिखाण करत असल्याने पाटील यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. मात्र त्यांच्यावरील या कारवाईचा मानवाधिकार कार्यकर्ते वकील असीम सरोदे यांनी निषेध केला.



पहाटे 2 च्या सुमारास संग्राम पाटील त्यांच्या कुटुंबासह मुंबईत आले. त्यावेळी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने त्यांना ताब्यात घेतले. साधारण दुपारी 3 च्या सुमारास संग्राम पाटील यांना चौकशी करून सोडण्यात आले. याबाबत पत्रकारांशी बोलताना संग्राम पाटील म्हणाले की, मी फेसबुकवरून सरकारविरोधात लिखाण करत असतो, त्यातील काही पोस्ट सरकारच्या लोकांना आवडल्या नाहीत. त्यांनी पोलिसांकडे तक्रार करून एफआयआर केली होती. त्यामुळे आज मला पोलिसांनी ताब्यात घेतले. दिवसभर चौकशी करून संध्याकाळी मला नोटीस दिली असं त्यांनी सांगितले. तसेच कुठल्या तरी एका राजकीय पक्षाची पोस्ट आहे. त्याच्यासोबत मला क्लब करून टाकले आहे. त्यामुळे हे प्रकरण गुंतागुतीचे आहे. मला त्यावर लगेच भाष्य करता येणार नाही. हा चौकशीचा भाग आहे. चौकशीतून निष्कर्ष काढला जाईल. मी सध्या थकलोय. साधारण 35-40 तास प्रवास करून मी मुंबईत आलो. पहाटे 2 पासून मला ताब्यात घेत चौकशी करत होते. मी माझी कायदेशीर बाबू तपासेन. तज्ज्ञांकडून सल्ला घेऊन मी माझा लढा लढेन असंही डॉ. संग्राम पाटील यांनी सांगितले. दरम्यान, संग्राम पाटील यांना लंडनहून मुंबईत उतरताच पोलिसांनी एअरपोर्टवर ताब्यात घेतले. आत्ताच त्यांच्याशी संपर्क झाला. त्यांना व त्यांच्या पत्नीला पहाटे 2 वाजल्यापासून पोलिसांनी चौकशीच्या निमित्ताने ताब्यात ठेवले होते. खरे तर हे अन्याकारक आणि छळवाद आहे. संग्राम पाटील हे लंडनमध्ये राहतात. सातत्याने सत्य, निर्भीड आणि स्पष्ट भूमिका मांडण्यासाठी ते प्रसिद्ध आहेत. एक उत्तम भारतीय जे आता लंडनवासी आहेत त्यांच्यामध्ये डॉ संग्राम पाटील यांचे नाव अग्रणी आहे. पोलीस त्यांच्याकडून चांगल्या वागणुकीचा बॉण्ड लिहून घेऊन त्यांना अटी आणि शर्ती घालून सोडले जाईल असं वाटते. मी त्यांच्या संपर्कात आहे आणि संग्राम पाटील यांना कोणतीही कायदेशीर मदत लागल्यास तशी पावले उचलण्यात येतील पण पोलिसांनी अन्यायकारक कारवाई करू नये, कोणत्याही राजकीय व्यक्तीला पोलिसांनी स्वतःचा गैरवापर करू देऊ नये असं मानवाधिकार कार्यकर्ते असीम सरोदे यांनी म्हटलं.

## 9 आसनी चार्टर्ड विमान कोसळले

### पायलटसह 6 जण गंभीर जखमी

**नवी दिल्ली :** भुवनेश्वरहून ओडिशातील राउरकेला येथे उड्डाण करणारे नऊ आसनी इंडिया वन एअरचे विमान शनिवारी दुपारी लँडिंग दरम्यान कोसळले. या अपघातात सहा जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. राउरकेला येथील रघुनाथपल्ली परिसरातील झुला ए ब्लॉकजवळ हे विमान कोसळले. दरम्यान, मिळलेल्या माहितीनुसार मोठी दुर्घटना टळली आहे. विमानातील सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे वाचवण्यात आले. इंडिया वन एअरलाइन्सच्या विमानाने दुपारी 1:30 वाजता काटीबंधा कंसाराजवळील एका शेतात आपत्कालीन लँडिंग केले. चार प्रवासी आणि दोन पायलट असलेले सिंगल-इंजिन विमान सुमारे चार ते पाच किलोमीटर उड्डाण केल्यानंतर तांत्रिक बिघाड झाला, ज्यामुळे पायलटला विमान क्रॅश-लँडिंग करावे लागले.



घटनास्थळी पोहोचलेल्या अग्निशमन विभागाच्या पथकाच्या म्हणण्यानुसार, सुंदरगड जिल्ह्यातील राउरकेला येथील कंसारा येथे एक छोटे खासगी विमान कोसळले, ज्यामुळे प्रवासी आत अडकले. माहिती मिळताच, राउरकेला अग्निशमन केंद्र आणि पानपोश अग्निशमन केंद्रातील अग्निशमन दलाच्या गाड्या जखमींना वाचवण्यासाठी घटनास्थळी पोहोचल्या. घटनेनंतर, जखमींना वाचवण्यात आले आणि उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. विमान राउरकेलाहून भुवनेश्वरला जात असताना ही घटना घडली. ओडिशाचे वाणिज्य आणि वाहतूक मंत्री बी.बी. जेना यांनी सांगितले की, ए-1 श्रेणीतील खासगी विमान अपघातात कोसळले. त्यात पायलटसह सहा जण होते. सर्व जखमी झाले आहेत आणि त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सर्वांची प्रकृती धोक्याबाहेर आहे. डीजीसीएला घटनेची माहिती देण्यात आली आहे.

## ‘एआय क्रांतीत भारत नेतृत्व करेल’, तज्ज्ञांचे मत

**मुंबई :** कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) केवळ तंत्रज्ञानापुरती मर्यादित न राहता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत परिवर्तन पोहोचवणारी शक्ती ठरत आहे. भविष्यातील एआय क्रांतीत भारत नेतृत्व करेल, असा ठाम विश्वास ‘एआय फॉर ऑल’ या परिषदेत तज्ज्ञांनी व्यक्त केला. या परिषदेत ग्रामीण व दुर्लक्षित समुदायांसाठी एआय वापरताना येणाऱ्या अडचणी, भारतीय भाषांतील एआय विकास, तसेच केंद्र व राज्य सरकारांच्या विविध उपक्रमांवर यावेळी सखोल चर्चा करण्यात आली.

आयआयटी मुंबईमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ‘एआय फॉर ऑल’ या परिषदेमध्ये ‘स्थानिक आव्हानांसाठी जागतिक सहकार्य निर्माण करणे’ या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या समूह समन्वयक सुनीता वर्मा, वाधवानी एआयचे अल्पन रावल आणि आयआयटी मुंबईच्या भारतजेन कंपनीचे डॉ. अमोल गीते उपस्थित होते. एआय प्रकल्प यशस्वी ठरण्यासाठी केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर सरकारी सहभाग, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि स्वीकारण्याची तयारी महत्वाची असल्याचे मत वक्त्यांनी अधोरेखित केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘विकसित भारत 2047’ या संकल्पनेच्या पार्श्वभूमीवर भारताने एआय क्षेत्रात भक्कम पायाभूत रचना उभारली आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विभागाअंतर्गत (डीएसटी) राबवण्यात येणाऱ्या विविध मिशनद्वारे संशोधन, स्टार्टअप्स आणि उद्योगांना चालना दिली जात असून, जागतिक पातळीवर नेतृत्त्व करण्याची तयारी पूर्ण झाल्याची माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या एकता कपूर यांनी दिल.

‘नॅशनल मिशन ऑन सायबर फिजिकल सिस्टिम’ या मिशनअंतर्गत देशातील आयआयटी, आयसर आणि आयआयएस्सी बंगळूरू यासारख्या संस्थांमध्ये टेक्नॉलॉजी इनोव्हेशन हब स्थापन करण्यात आले आहे. हे हब केवळ संशोधनापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उपयोगी तंत्रज्ञान, उत्पादन विकास आणि व्यावसायिकरणावर भर देण्यात येणार असल्याचेही कपूर यांनी सांगितले.

भारतीय भाषांतील एआय अधिक समावेशक करण्यासाठी ‘व्हॉईस-फर्स्ट’ दृष्टिकोन महत्वाचा ठरणार असल्याचे मत आयआयटी मुंबईची भारतजेनचे अमोल गीते यांनी व्यक्त केले. सध्या 22 भारतीय भाषांवर आधारित एआय मॉडेल्स विकसित होत असून, आवाजाच्या माध्यमातून संवाद अधिक नैसर्गिक आणि परिणामकारक ठरतो. यामुळे कमी संसाधनात अधिक प्रभावी एआय प्रणाली तयार करता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.

## आपटे प्रकरणी भाजप बॅकफूट वर

### आपटे ठरला एक दिवसाचा नगरसेवक, लैंगिक शोषणाच्या आरोपानंतर दिला राजीनामा

**मुंबई :** राज्यात सध्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात सहआरोपी असलेल्या तुषार आपटे यांची भाजपाने बदलापूर कुळगाव नगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवकपदी निवड केली होती. त्यामुळे वेगवेगळ्या पक्षांनी नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र आता तुषार आपटेंनी स्वीकृत नगरसेवक पदाचा राजीनामा दिला आहे. आपटेंनी आपला राजीनामा भाजपाच्या वरिष्ठांकडे सोपवला आहे. सर्वच स्तरातून टीका झाल्यानंतर राजीनाम्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



बदलापूर कुळगाव नगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवकपदाचा राजीनामा देताना तुषार आपटे म्हणाले की, ‘मी स्वीकृत नगरसेवकाचा राजीनामा देत आहे. खाजगी शाळेचा आणि भाजपला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी मी राजीनामा देत आहे. बाकीच्या गोष्टी नंतर बोलू. माझा राजीनामा मी स्वतःहून देत आहे. पक्षाची बदनामी होऊ नये यासाठी मी राजीनामा देत आहे.’ बदलापूर उपनगराध्यक्ष प्रियंका दामले यांनी तुषार आपटे यांच्या प्रकरणावर भाष्य केले होते. त्या म्हणाल्या की, ‘काल भाजपने स्वीकृत नगरसेवकांची निवड केली, सर्व निर्णय त्या पक्षाचा अधिकार आणि भूमिका आहे. हा विषय न्यायालयात आहेत. आम्ही जेव्हा आंदोलन केली आमची एकच मागणी होती की मुख्य आरोपीला शिक्षा झाली पाहिजे होती आणि त्याला निसर्गाने शिक्षा दिली. या गोष्टी न्यायालयामध्ये असल्यामुळे न्यायालयाचा निकाल येईल. आम्हाला न्यायालयावर पूर्ण विश्वास आहे. आरोपी तुषार आपटे कुळगाव बदलापूर नगरपालिकेत भाजप स्वीकृत नगरसेवक झाला आहे यावरून लैंगिक अत्याचार याबद्दल भाजपने बक्षीस दिलाय का असा सवाल संजय राऊत यांनी विचारला होता. यावर बोलताना भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले होते की, ‘त्याच्यावर योग्य कारवाई होईल. ज्यांनी ज्यांनी चूक केली त्यांच्यावर कारवाई होत असते. निष्पक्षपणे कारवाई होईल चिंता करण्याची गरज नाही.’

## भाजप प्रत्यक्षात ‘गुन्हेगार बचाव’ मोहिमेवर : यशोमती ठाकूर

**अमरावती :** बदलापूर येथील एका शाळेत लहान मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील सहआरोपी तुषार आपटे याची भाजपने स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती केल्याने राजकीय वातावरण पेटले आहे.



काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी या प्रकरणात भाजपवर जोरदार टीका केली आहे. बदलापूर बालिका अत्याचार प्रकरणातील सहआरोपी तुषार आपटेला भाजपकडून स्वीकृत नगरसेवकपदाची बक्षिसी देणे म्हणजे आश्चर्यच आहे. बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या एन्काऊंटरचा मागील निवडणुकीत राजकीय प्रचारासाठी वापर केला. पण आपटेला या प्रकरणातून वाचविण्यासाठी अक्षय शिंदेचा एन्काऊंटर केला गेला का मग?, असा सवाल यशोमती ठाकूर यांनी केला आहे.

भाजपची ‘बेटी बचाओ’ फक्त घोषणाच उरली आहे, प्रत्यक्षात भाजप ‘गुन्हेगार बचाव’ मोहिमेवर आहे. महाराष्ट्राच्या लेकी हे विसरणार नाही, अशी टीका यशोमती ठाकूर यांनी केली आहे.

महिला सुरक्षिततेच्या गप्पा मारणाऱ्या भाजपचा खरा चेहरा पुन्हा एकदा उघडा पडला आहे. बदलापूर येथील चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचार प्रकरणातील आरोपी तुषार आपटे याला भाजपने थेट स्वीकृत नगरसेवक पद देऊन आरोपींचे संरक्षणच केले आहे. भारतीय जनता पक्ष आता ‘बलात्कारी जनता पक्ष’ बनला आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

## काँग्रेसतर्फे ‘मनरेगा बचाव अभियान’

**चंद्रपूर :** ग्रामिण भागात मागेल त्याला काम या उद्देशाने 1972 मध्ये तत्कालीन काँग्रेस सरकारने सुरू केलेली रोजगार हमी योजना कार्यान्वीत करण्यात आली होती. कालांतराने या योजनेला मनरेगा योजनेत परावर्तीत करण्यात आले. या योजनेद्वारे गावखेड्यातील नागरिकांना कायद्याने काम मागण्याचा अधिकार प्राप्त होता. मात्र, आता केंद्रातील मोदी सरकारने मनरेगा योजनेचे नाव बदलून नव्या स्वरूपात आणलेल्या योजनेत नागरिकांच्या हक्कावर गदा आणण्यात आली आहे, असा आरोप चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांनी आज पत्रकार परिषदेत केला.

केंद्र सरकारने सर्वसामान्यांच्या हक्कावर गदा आणल्याच्या निषेध करण्यासाठी उद्या चंद्रपूर येथील इंदीरा गांधी सांस्कृतिक प्रियदर्शिनी चौकासमोर एक दिवसीय उपोषण करण्यात येणार असल्याचे यावेळी धोटे यांनी सांगितले. मनरेगा योजनेतंर्गत ग्रामिण भागातील कोणत्याही कुटूंबाला सरकारकडे रोजगार मागण्याचा अधिकार मिळाला होता. मात्र आता नव्या योजनेतील कायद्याद्वारे हा अधिकार गोठवून सरकारकडे अधिकार देण्यात आला आहे. कुठे आणि कुणाला काम द्यायचे हे सरकार ठरविणार आहे. यासोबतच काम मागणाऱ्यांना किमान मजूरी कायद्याने ठरविल्याप्रमाणे मिळत होती. परंतू, आता नव्या योजनेत हा अधिकार देखील सरकारने काढून घेतला आहे.

## नवोदयच्या विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू

**बुलढाणा :** लातूर जिल्ह्यातील काटा (ता. औसा) येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या वसतिगृहात इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या निरागस अनुष्का पाटोळे (वय 12) हिचा 3 जानेवारी रोजी रात्री झालेला संशयास्पद मृत्यू संपूर्ण समाजमनाला हादरवून सोडणारा आहे.

हा मृत्यू हत्या की आत्महत्या, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. या प्रकरणातील सत्य बाहेर यावे व दोषींना कठोर शिक्षा व्हावी, तसेच अनुष्काला न्याय मिळावा, या मागणीसाठी चिखली तालुक्यातील सकल मातंग समाजातर्फे कॅन्डल मार्च काढण्यात आला. काल शुक्रवारी रात्री चिखलीत काढण्यात आलेल्या या कॅन्डल मार्चमध्ये महिला व पुरुष नागरिक

### चिखलीत मातंग समाजाचा कॅन्डल मार्च



हातात मेणबत्त्या घेऊन सहभागी झाले. त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला.

चिखली शहरातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कॅन्डल मार्चची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सम्राट अशोक, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना वंदन करण्यात आले. पोलीस लाईन, सिंधी कॉलनी चौक, अंजली टॉकीज मार्गे हा मार्च पुढे जात फुले शाहू आंबेडकर चौक येथे समारोप झाला. अशोका वाटिका येथे झालेल्या समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला. ज्येष्ठ नेते कैलास खंडारे यांनी अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली.अन्यथा महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सरकारला दिला. युवा नेते भाई छोटू कांबळे यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत, भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी गुन्हेगारांवर कठोरात कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी केली. याप्रसंगी राजीव जाधव, गवई , मिलिंद मघाडे, प्रवीण कांबळे, सचिन कांबळे, किरण बोरकर, योगेश साळवे, विलास घोरपडे, विलास निकाळजे आदी मान्यवरांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. हा कॅन्डल मार्च शांत, शिस्तबद्ध व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडला.

## गुजरातमध्ये ४ तासांत भूकंपाचे 11 धक्के

**गांधीनगर :** गुजरातमध्ये मोठा भूकंप झाला आहे. या भूकंपामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे. गुजरातच्या राजकोट जिल्ह्यात अवघ्या 4 तासांमध्ये भूकंपाचे एकामागून एक तब्बल 11 धक्के जाणवले आहेत. अचानक आलेल्या या मोठ्या संकटामुळे जिल्ह्यातील लोकांमध्ये दहशत निर्माण झाली आहेत, नागरिक प्रचंड घाबरले आहेत. भूकंपाचा पहिला धक्का जाणवताच नागरिकांनी घराच्या बाहेर धाव घेतली.










“ यशाच्या मागे धावू नका,
स्वत:ला इतके सक्षम बनवा की यश तुमच्या मागे धावेल... ”



# युगसंघर्षाची कविता मकाबी - एक परिचय




**डॉ. वसंत शेंडे सरांनी अतिशय महत्प्रयासाने संपादित केलेला एक सुंदर ग्रंथ 'युगसंघर्षाची कविता : 'मकाबी' वाडमयीन प्रांगणात वाचकांपुढे सादर झाला आहे. युगकवी केतन पिंपळापुरे यांच्या 'मकाबी' या लोकप्रिय आणि अतिप्रसिद्ध 'मकाबी' या कविता संग्रहावरील महाराष्ट्रातील नामवंत समीक्षकांच्या समीक्षेचे ते संकलन आहे आणि त्यास सरांनी लिहिलेली सर्वोत्तम प्रस्तावना एक विलोभनीय अनुभूती प्राप्त करणारा आहे. केतन पिंपळापुरे मराठी काव्यविश्वाच्या क्षितिजावर उगवलेला एक काव्यसूर्य पन्नासीच्या आयुष्यात मावळला. परंतु काव्यतेज अजूनही साहित्याच्या प्रांगणात लखाकत आहे. सूर्यकंकण, मार्शलरेस, डेमोफून, मकाबी, हेमलॉक, नोबल टूथ इत्यादीं एकापेक्षा एक सरस काव्यसंग्रह अभ्यासकांच्या ओंजळीत टाकले. 'नोबल टूथ' महाकाव्याचे पाच खंड त्यांना प्रसिद्ध करायचे होते. तसे जर झाले असते, तर आणखीच काही क्रांतिकारी घडले असते. केतन पिंपळापुरे म्हणजे अग्रलेखाचा बादशाह, ज्यांनी 'दि पिपल' मधून सगळेच संपादकीय लिहिले. विविध दैनिकातून स्तंभलेखन केले, अनेक पुरविण्या संपादित केल्या. प्रखर लेखक, कॅलीग्राफर, चित्रकार, मूर्तिकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या व्यक्तीमत्वाने 2005 ला अमरावती येथे झालेल्या पहिल्या आंबेडकरी विद्यार्थी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून सन्मान प्राप्त केला.**

डॉ. वसंत शेंडे प्रस्तुत ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत लिहितात, 'केतन पिंपळपुरेंच्या कवितेची महत्ता केवळ तिच्या आविष्कार सौष्ठवात आहे असे नाही, तर कवीच्या मूल्यनिष्ठेत आहे. कवीची मूल्यनिष्ठा जेव्हा मानवमुक्तीच्या प्रत्यक्ष लढ्याशी एकरूप राहून स्वत्वशोध घेत आविष्कृत होते, तेव्हा मायकोव्हस्की, लॅन्गस्टन ह्यूजेस, पाब्लो नेरुदा वा आमीरी बराका यासारख्या कवींच्या कविता जन्म घेतात. केतन पिंपळपुरे स्वतः आंबेडकरी चळवळीतील प्रत्यक्ष कृतिशील कार्यकर्ते होते. सामाजिक संघर्ष व राजकीय धारणांची स्पष्टता त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्यांच्या कवितेतून हा विचार भावस्वरांच्या रूपात परिणत झालेला दिसतो. 'वुई दि रिपब्लिकन' या कवितेत त्याची प्रतीती आहे. मकाबीतील केतन पिंपळपुरेंची कविता सापेक्ष धारणांना आंतरिक ऊर्जेने भिडते - त्यांचे सम्यक आकलन-अन्वेषण करून साक्षेपाने युगसत्याचे प्रतिपादन करते. म्हणून ती युगकविता ठरते.'

पुढे डॉ. शेंडे सर म्हणतात, 'रवीन्द्रनाथ, इलियट, इकबाल, फैज, नझरूल, साहीर, मुक्तिबोध, निराला, नागार्जुन, सरदार जाफरी यांनी भारतीय साहित्याला युगकवितेचा मौलिक वारसा दिला. त्याच्याही आधी मध्ययुगात कबीर, रैदास, नामदेव, तुकाराम आणि आधुनिक काळात जोतीबा फुले यांनी युगकाव्य लिहिले. आजच्या मराठी कवितेत हा वारसा केतन पिंपळपुरेच्या काव्यप्रतिभेतून प्रकट होत आहे. विशेषतः रवीन्द्रनाथांच्या काव्यअन्वेषांचे पुनःस्मरण भारतीय साहित्याला व्हावे, इतकी उदात्त उत्कटता केतन यांची कविता भारतीय साहित्यविश्वाला देण्याची शक्यता आहे. वर्ग,वर्ण, लिंगभाव भेदरहित समतामूलक विश्वासाठी आणि विश्वशांतीसाठी विश्वाची पुनर्मांडणी करण्याचे स्वप्न पाहून विश्वाचे पुनःसर्जन करणारी प्रातिभ कृती केतनच्या काव्यलेखनातून घडते.'

केतन पिंपळापुरे यांच्या कवितांच्या संदर्भात केलेले हे सर्वोच ऊंचीचे भाष्य आहे. त्यांच्या कवितांच्या अंतरंगात जेव्हा काव्यप्रेमी विहंगमावलोकन करतो, तेव्हा भाष्य अगदी खरे ठरते. समता सैनिक दलाचे एक कठोर निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. नामांतर, रिडल्स, घाटकोपर, खैरलांजी इत्यादी असंख्य आंदोलनात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग राहिला आहे. 'केशवसुत, कुसुमाग्रज, वामनदादा, विंदा करंदीकर, नारायण सूर्वे, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, अरूण काळे ही मराठी कवितेची जी सूर्यकुलीन परंपरा आहे, त्यातील एक अद्वितीय कवी म्हणून केतन पिंपळापुरेंची ओळख राहील', हे डॉ. शेंडे सरांचे अप्रतिम भाष्य आहे. डॉ. गंगाधर पानतावणे, मोतीराम कटारे, उत्तम कांबळे, डॉ. महेंद्र भवरे, आनंद चक्रनारायण, डॉ. शैलेंद्र लेंडे इत्यादी असंख्य समीक्षक त्यांच्या कवितेवर प्रेम करणारी मंडळी आहे; ही यादी आणखी खूप मोठी आहे.

'मकाबी' 2012 ला जेष्ठ समीक्षक मोतीराम कटारे आणि डॉ. वसंत शेंडे यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध झाला, त्या संदर्भात डॉ. शेंडे सर म्हणतात, 'मकाबीच्या प्रकाशन समारंभातच ती युगकविता आहे असा विचार अभिव्यक्त होऊ लागला' आणि हे खरेही आहे. कारण युकवीची सर्वोच्च प्रज्ञा-प्रतिभा बोध प्रतित होत असल्याबाबत अनेक वक्त्यांचा तसा समयोचित सूर त्या परिसंवादात प्रतिपादित झाला होता. आणि प्रस्तुत ग्रंथातील समीक्षेमध्ये सुद्धा काही लेखकांनी तसा स्पष्ट उल्लेखसुद्धा केला आहे. त्याचे संपूर्ण श्रेय शेंडे सरांनाच जाते. कारण केतन नावाचा अष्टपैलू हिरा त्यांनीच प्रथम ओळखला आणि त्यावर काव्यसंस्कार सुद्धा केले.

काही समीक्षकांची निरिक्षणे मनोवेधक आहेत. डॉ. शैलेंद्र लेंडे म्हणतात, 'जागतिक वाङ्मयाला वाट पुसत पुढे जाऊ पाहणारी काव्यवृत्ती उजागर होते.' डॉ. अशोक इंगळे म्हणतात, 'हा कवी मराठी सोबत हिब्रु, इंग्रजी, हिंदी, पाली, ग्रीक आदी जागतिक भाषांतील उत्कृष्ट वाङ्मयातून प्रतिमा व प्रतिकांचा शोध घेतो.' डॉ. अक्रम हबीबखान पठान -'मकाबी हा शब्द हिब्रू भाषेतील आहे.' प्रा. विमल गाडेकर : 'विपस्सनेचे अवडंबर अशांना कवी वधस्तंभाकडे निघालेले मेंढरांचे कळप संबोधतो.' प्रशांत वंजारे - 'मोहोळाच्या पोळीवर मधमाशा जशी गर्दी करतात, तसे शब्द त्यांच्या अवतीभवती असतात.' राज मेहेर - 'मकाबी हा प्राचीन हिब्रू शब्द. त्याचा अर्थ हातोडा! दुसरा अर्थ जनलढ्याचा नायक.' डॉ. गंगाधर पानतावणे - 'मनोगतात तुम्ही म्हटले की, तुमची कविता पारंपरिक काव्यसंकेतात बसत नाही. तिला कुठलेच मान्यताप्राप्त काव्यशास्त्र किंवा सौंदर्यशास्त्र लागू होत नाही! ही बाब मला मौलिक वाटते.'


पुरुषोत्तम संबोधी
मो.9422803760

गच्च काळोखातील एक ज्योत ठरावी, असे काव्यप्रयोजन सांगणाऱ्या कवीचा 'मकाबी' काव्यसंग्रह प्रसिद्धीच्या सर्वोच्च शिखरावर पोहचला होता. त्या कविता संग्रहाला महाराष्ट्रातून चवदापेक्षा जास्त राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले. त्यावर असंख्य समीक्षणे सुद्धा प्राप्त झाली होती. ते सगळे एकत्र करून प्रसिद्ध करण्याचा केतन पिंपळापुरे यांचा मानस होता. परंतु येणाऱ्या भविष्यकाळात काय अघटित घडेल, याची कोणालाच शास्वती नसते. प्रत्यक्ष प्रस्तुत कवीला सुद्धा नसेल. त्यांचे अकल्पित जाणे आंबेडकरी साहित्य चळवळीला, मराठी काव्यविश्वाला एक मोठा अपघात ठरला. 'मकाबी' वर प्राप्त झालेली समीक्षणे पुस्तकाच्या रूपात प्रसिद्ध करणे समता सैनिक दल आणि समता संगर प्रकाशनचे कर्तव्य होते. त्यांच्या समग्र साहित्याचे सहृदय चाहते, अभ्यासक, संशोधक डॉ. वसंत शेंडे सरांनी स्वतः जबाबदारी स्वीकारली आणि संपादनाच्या मौलिक परिश्रमातून 'युगसंघर्षाची कविता मकाबी' हा अनमोल समीक्षा ग्रंथ प्रसिद्धीस आणला. त्या करीता सरांचे जेवढे आभार व्यक्त करावे, तेवढे कमीच आहेत.

या समीक्षा ग्रंथात डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ. आशालता कांबळे, डॉ. अशोक इंगळे, डॉ. अक्रम हबीबखान पठाण, प्रा. विमल गाडेकर, प्रशांत वंजारे, प्रा. सुनंदा किसनराम रेवसे, प्रा. मीनल येवले, डॉ. सुरेश वर्धे, सत्य कुटे, पुरूषोत्तम संबोधी, एजाज खान, राज मेहर, किरण शिवहर डोंगरे, नंदू वानखडे, अशोक बोंदाडे, बाबाराव बाभळे, हरिहर बोरकर, प्रशांतकुमार डोंगरदिवे, अमर रामटेके इत्यादी वीस समीक्षकांची सुंदर समीक्षणे त्यामध्ये अंतर्भूत केली आहेत. परिशिष्ट मध्ये डॉ. गंगाधर पानतावणे, उत्तम कांबळे, डॉ. महेंद्र भवरे, आनंद चक्रनारायण यांचा केतन पिंपळापुरे यांचे सोबत झालेला पत्रव्यवहार आहे. 'मकाबी' तसेच त्यांच्या इतरही कविता संग्रहाला प्राप्त झालेल्या सगळ्या पुरस्कारांची यादी त्यात आहे. डॉ. वसंत शेंडे सरांची प्रस्तुत पुस्तकाला बहुमूल्य प्रस्तावना आहे, जी केतन पिंपळापुरे यांच्या वाङ्मयीन ऊंचीचा उदात्त परिचय करून देते. हे सगळे वाचल्याशिवाय वाचकांना काव्यसौंदर्य कळणार नाही. म्हणून ज्यांनी 'मकाबी' वाचला त्यांनी आणि जे काही कारणांमुळे तो अनमोल कविता संग्रह प्राप्त करू शकले नाही, त्यांनी प्रस्तुत संपादित समीक्षा ग्रंथ अवश्य वाचावा आणि प्रतिक्रिया कळवावी, ही अगत्यपूर्वक सविनय विनंती आहे. 'मकाबी'चे समीक्षामूल्य निश्चितच आपल्याला अनन्यसाधारण अनुभूती दिल्याशिवाय राहणार नाही. ■ ■

युगसंघर्षाची कविता - मकाबी
**संपादन - प्रा. डॉ. वसंत शेंडे,**
समता संगर प्रकाशन, नागपूर.
पृष्ठे 144, किंमत रू. 200/-

# रडून काय होणार? आता लढावे लागेल !

एक कवि असा म्हणतो,
**'रोनेवालो के साथ लोग**
**हमेशा रोया नहीं करते ।**
**हसने वालोके साथ लोग**
**हमेशा हसा करते है ॥'**

आपल्या दु:खाबद्दल जे लोक नेहमी रडत बसतात त्यांचेसोबत लोक नेहमी रडू लागत नाहीत. परंतु जे लोक नेहमी हसत जगतात, त्यांचेसोबत लोक हसत आनंदी रहातात. ही आठवण यासाठी झाली की, मी नेहमी माझ्या लेखातून संकटाची जाणीव करून देतो तेव्हा लोकांना हे आमचे रडगाणे आहे असे वाटू नये. कारण रडून कोणतेही संकट नष्ट होत नसतात. त्यासाठी संकटग्रस्त लोकांना लढावे लागते. हे देखील मी नेहमी जाणीवपूर्वक आठवण करून देतो. त्याचेपण कारण आहे. समाजाला क्रांतीचे सूत्र सांगताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे सांगतात की, 'गुलामांना गुलामीची जाणिव करून द्या म्हणजे ते स्वत: बंड करून उठतील.' लढण्यासाठी तलवार, बंदूक किंवा बॉम्बची गरज नाही. गुलामीत ढकलण्यात आलेल्यांची संख्या एवढी प्रचंड आहे की तिची एक कृती कोणत्याही बॉम्बपेक्षा भयानक विस्फोटक आहे. त्यांना केवळ गुलामीची जाणिव करून देण्याची गरज आहे. त्यामध्ये विचाराची सत्यता, विचार मांडण्याची सौजन्यशील पद्धती आणि त्यातील सातत्य याची जुळवाजुळव करणे हे काम आम्हाला प्रत्येकाला करावे लागेल. यालाच शत्रू घाबरतो. म्हणून तो आपल्याला संघटित होऊ देत नाही. त्यासाठी त्यांनी विविध प्रकारचे षडयंत्र रचले आहेत. तात्विक भेद, धर्मभेद, जातीभेद, गरीब श्रीमंत भेद, भाषा भेद, प्रांत भेद, साक्षर आणि अडाणी भेद, कॉलनीत राहणारे आणि झोपडपट्टीत राहणारे हे सर्व भेदाचे प्रकार आपल्याला गुलामीत ठेवतात. आपण त्याला बळी पडत आहोत. साम - दाम - दंड आणि भेद या चार कूटनीतीचा वापर करून शत्रू आपली संघटित शक्ती विभाजित करतात. विभाजन तोडून सांघटीत होणे ही खिंड आपण मजबुतीने जर लढलो तर शत्रू आपल्यासमोर नांगी टाकतो. म्हणून आपल्या भाषणातून, लिखाणातून, गाण्यातून, चर्चेतून आपले भेद आणखी वाढतील हे टाळणे आवश्यक आहे. ते आपण सर्व मिळून प्रयत्न करू. कोणी उपदेशक नाही. कोणी गुरू नाही. कोणी कोणाचा शिष्य नाही. आपण सर्व गुलाम म्हणून जगत आहोत हेच एकमेव सूत्र आपण स्मरणात ठेवले पाहिजे. गुलामीच्या बेड्या आपल्याला अलंकार वाटतात. कारण आपण मानसिक गुलाम झालोत. कुणाच्या पायात लोखंडाच्या बेड्या ठोकल्या तर कुणाच्या पायात पितळेच्या, कुणाच्या तांब्याच्या तर कुणाच्या चांदीच्या, कुणाच्या सोन्याच्या तर कुणाच्या पायात हिरेजडीत बेड्या ठोकल्या आहेत. हे वास्तव लक्षात घेऊन आपल्या गुलाम बांधवांना समजून सांगावे लागेल.

**गुलामीचे चटके सर्वांना सारखे बसणार नाही :-** सर्वच लोकांना एका वेळी गुलामीची जाणिव होत नसते. प्रत्येक जाती धर्मासाठी वेगळे कपट केले असते. प्रत्येकाची बुद्धी, संवेदनशीलता, सहनशीलता वेगवेगळी असते. त्यामुळे त्या व्यक्तींना जागे करण्यासाठी त्यांचे प्रबोधन करावे लागते. नंतर हळू हळू जागृती येते.

**मैं अकेले ही चला था, जानीबे मंजिल मगर ।**
**लोग आते गये और , कारवा बनता गया ॥**

जगातील गुलामगिरी विरूद्ध लढा कुणी तरी एकाने सुरू केला. हळू हळू लोक जुळत गेले आणि एक दिवस जनसागर निर्माण झाला. मोठमोठ्या हुकूमशहाना सत्ता सोडावी लागली हा इतिहास आहे. म्हणून गुलामीचे स्वरूप समजून घ्या आणि मग लढाईत उतरा.

**मानसिक गुलामी मोठी चिवट आहे :-** गुलामीची सुरुवात मानसिक गुलामीपासून सुरू करण्यात येते. ही गुलामी जळूसारखी चिवट आहे. ती गुलामांना कळत नाही. त्यासाठी त्यांनी धर्म आणि देव वापरला. खरे पाहिले तर आपला धर्म निसर्ग आणि माणूसकी आहे. पण त्यांनी मैत्री निर्माण करणारा धर्म सोडायला लावला आणि त्यांचा अंधश्रद्धा निर्माण करणारा, जातीय दंगल निर्माण करणारा, आपसात मारामाऱ्या करणारा धर्म शिकवला. त्यासाठी त्यांनी गुलामीच्या बेड्यासारख्या बनवल्या नाहीत. ब्राम्हण महिलांच्या बेड्या हिरेजडित आहे, ओबीसी समाजाच्या बेड्या सोन्याच्या आहेत. आदिवासी समाजाच्या बेड्या तांब्याच्या आहेत. मुसलमानाच्या बेड्या पितळेच्या आहेत आणि दलितांच्या बेड्या अस्सल लोखंडाच्या पोलादी आहेत. शेवटी सर्व गुलामांच्या पायात बेड्या ठोकल्या आहेत. हे सत्य आहे. मात्र ते आपल्या बायकांना सांगतात, 'हे भाग्यवान, तुझ्या पायातील बेड्या फार सुंदर दिसतात, त्या फारच चमकतात. मग ब्राम्हण बाया दररोज आरश्यात पाहतात आणि आनंद मानतात. ओबीसी समाजाला सांगतात, तुमच्या पायातील बेड्या सोन्यासारख्या फार छान दिसतात. तांबा, पितळ, लोखंडापेक्षा अधिक सुंदर दिसतात. असेच ते आदिवासी, मुसलमान, ख्रिश्चन या सर्वांना भूल देऊन दलितांच्या लोखंडी पोलादी बेड्याकडे पाहून आनंदी कसे होतील असे वातावरण निर्माण करतात. त्यामुळे आपल्या बेड्या फार सुंदर आहेत, असे मानसिक गुलामांना वाटू लागते. पण दलीत मात्र लोखंडी बेड्या तोडण्यासाठी जेव्हा प्रयत्न करतात, तेव्हा बाकीचे त्याला शिव्या देऊन, त्याची मजाक करून त्याचे मनोबल कमी करीत असतात. उलट त्याला तसे करण्यापासून दूर करण्याचा प्रयत्न करतात. हेच आजपर्यंत होत असल्याने दलित लोक या मानसिक गुलाम असलेल्या स्त्रिया, आदिवासी, ओबीसी, मुस्लिम, ख्रिश्चन या गुलामांना शिव्या देतात. त्यामुळे ते सर्व गुलाम दलितांवर नाराज होऊन तुटून पडतात. ब्राम्हण मात्र हे पाहून फार आनंदी होतो. हे असेच आता पर्यंत चालत आले आहे. परंतु आता मात्र आदिवासी, ओबीसी, मुस्लिम, ख्रिश्चन यांच्या पायात देखील लोखंडाच्या बेड्या 2014 सालापासून ठोकणे सुरू झाले. परंतु गुलामीत आनंद मानण्याची लोकांना संवय लागल्याने ते 2014 आणि 2019 साली बेसावध होते. आता मात्र लोखंडी बेड्याचा त्रास जाणऊ लागला. म्हणून काही लोक यू ट्यूब, वर्तमान पत्र, पुस्तके लिहून, भाषण करून रोष व्यक्त करीत आहेत. हळूहळू हा सर्व समाज मोठ्याने आवाज काढेल. त्या आवाजाने देखील हा संघ प्रणित ब्राम्हण बेजार होईल. एवढी शक्ती आपल्याजवळ आहे. तोपर्यंत दलितांनी लोखंडी बेड्या तोडण्याचा उपाय शोधला असेल. कारण त्याला त्या बेड्या असह्य आहेत. त्यामुळे त्या हातोडीने हिरे, सोने, चांदी, तांबा आणि पितळेच्या बेड्या तोडण्यास सुरुवात झाली असेल. हे 1818 साली भीमा कोरेगावच्या युद्धात झाले. पेशवाई नष्ट झाली. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांनी त्या बेड्या तोडण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम म्हणून हिरेजडित ब्राम्हण बायांच्या बेड्या तुटून पडल्यात. सतीची प्रथा बंद झाली, विधवा विवाह सुरू झाले, शिक्षण घेण्याचा अधिकार मिळाला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या कटरने सर्वांच्या बेड्या तोडल्या. हा इतिहास आपण सर्वांनी पाहिला आहे. म्हणून खचून जाऊ नका. आपला इतिहास जिंकण्याचा आहे. पण तसाच तो मानसिक गुलाम होण्याचा देखील आहे. म्हणून इतिहासातून धडा घेऊया. प्रथम मानसिक गुलामी विरुद्ध प्रबोधन केले पाहिजे. त्यातून कशी आर्थिक, राजकीय, धार्मिक, सामाजिक, गुलामी आली हे समजून सांगितली पाहिजे. आज भारतावर कोणी ब्रिटिश, अमेरिका, पाकिस्तान गुलामी लादून राहिलेला नाही. देशांतर्गत उच्चवर्णीय लोक देशातील मागास हिंदू आणि मुसलमान, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, कम्युनिस्ट, विवेकी, लोकशाहीवादी लोकांना गुलाम बनवीत आहेत. त्याचे नेतृत्व क्रूर असलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ करीत आहेत. गुलाम करण्याची पद्धती देखील अजब आहे. ती ते गुलामांच्या लक्षात येऊ देत नाही. उलट गुलामीची बेडी अलंकार मानून गुलाम स्वत:च आपल्या हातात बांधून घेतात. ही किमया कशी होते? हे समजून घेणे प्रत्येकांसाठी मोठे कठीण आहे.




**मानसिक गुलामी कशी येते? :-** प्रथम आर्थिक, राजकीय, सामाजिक गुलामी लादल्या जात नाही. प्रथम मानसिक गुलामी लादल्या जाते. ती लादण्यासाठी लोकांची मानसिकता तयार करण्यात येते. त्या लोकांना ज्ञानापासून दूर ठेवलेले असते. त्यामुळे त्यांना सत्य-असत्य कळत नसते. ते चिकित्सा करीत नसतात. त्यामुळे ते लवकर भ्रमात येतात. हातसफाई करणारा जादुगार जसा जादू दाखवतो. ते कार्यकारणभाव आपल्याला कळत नाही. म्हणून त्या भ्रमात लोक अडकतात. जसे जागृत देवस्थान लिहिलेला बोर्ड मंदिरासमोर बोर्ड लावल्या जातो आणि तो वाचून देवभोळे लोक भ्रमात येतात आणि त्यांना ते सत्य वाटायला लागते. परंतु दगडाचा देव कुठलाही असो तो जामसावळीचा मारोती असो की आपल्या गावातला मारोती असो तो सारखाच असतो. मानव निर्मित असतो. दोघानाही शेंदूर फासलेला असतो. एक जागृत आणि दुसरा झोपला असे कधीच होत नसते. पण हिंदू लोक त्यातल्या त्यात मध्य प्रदेश, छत्तीसगड राज्यातील हिंदू त्यातही आदिवासी, नंतर दलीत व ओबीसी त्यातही महिला अधिक भ्रमात पडतात. जे लोक अभावग्रस्त असतात ते लवकर बळी पडतात. अंधश्रद्धा याच लोकात अधिक वेगाने पसरत असते. कारण गरिबी, दुःख, अभावग्रस्त जीवन, भीती, दहशत आणि अज्ञान असल्याने ते लवकर अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकणार. यासाठी सत्ताधारी उच्चवर्णीय वर्ग शिक्षणाचा दर्जा सुदृढ होणार नाही याची काळजी घेतो. त्या मागे देव दैव, पाप पुण्य, कर्मकांड, पुरोहितशाही, बुवा-बाबा, तांत्रिक मांत्रिक हे लचांड अशा समुदायात लवकर प्रस्थापित होते. त्यांना उच-नीच भावना लवकर पटते. जातीयता ते जीव की प्राण मानतात. त्यातून होणारे शोषण अखेर गरिबी, बेरोजगारी, व्यसनाधीनता, गुन्हेगारी, फुटिरता, कलह निर्माण होते. अशी ही भूमी मानसिक गुलामी निर्माण होण्यासाठी सुपीक असते. त्यावर राजकीय गुलामी सहज प्रस्थापित करता येते. जसे लाडकी बहीण योजना आणून महिलांची मते भाजपने आपल्या बाजूने वळविली. अभावग्रस्त लोकांना लाभ थोडा जर मिळत असेल तर तत्काळ त्याला काही वेळेसाठी तो सुखद अनुभव असतो. म्हणून तो लवकरच त्या जाळ्यात फसतो. जशी एखादी आक्रमक गाय कसायाला जवळ घ्यायची असेल तर तो तिला हिरवा चारा दाखवतो. ते संकट आहे हे त्या लोभी, अज्ञानी गायीला कळत नाही. म्हणून ती त्या जाळ्यात फसते आणि कापल्या जाते. नेमके तसेच या मानसिक गुलामीचे आहे. हे लोक लवकर फसतात, लवकर भांडतात, लवकर जातीय दंगल करतात, लवकर आत्महत्या करतात. ही प्रक्रिया ब्राम्हणांनी 1925 नंतर योजनाबद्ध रीतीने राबविली. आज तिने भयानक रूप धारण केले. ते रूप म्हणजे आजची सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक गुलामी होय. ब्राम्हणांनी 1925 साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना करून त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

लेखांक १४१


अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

**लढा हिंदूंनाच उभारावा लागेल :-** 19 व्या शतकात ब्रिटिश राजवटीमुळे मनुस्मृतीचे कायद्याने चाललेले राज्य नष्ट झाले. त्या विरुद्ध लढा हिंदू पिडीतांनीच दिला. अस्पृश्य हे हिंदूच होते. ज्योतिबा फुले हिंदूच होते. बहुतेक सर्व सुधारक हिंदूच होते. त्यांनीच ब्राम्हणी सत्तेविरूद्ध विद्रोह केला आणि स्त्रियांचे पायातील हिरेजडित बेड्या तोडल्या. त्यांनीच शिक्षणाची सुरुवात केली आहे. त्यामुळे दलीत, आदिवासी, ओबीसी, मुस्लिम सर्वच शिक्षण घेऊ लागले. महात्मा फुलेंसोबत ओबीसी लोक मोठ्या संख्येत होते. इतर सर्व देखील होते. तो आपल्या स्वातंत्र्याच्या लढाईचा एक भाग होता. शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रयत्न देखील आमचा सामाजिक स्वातंत्र्याचा लढा होता. ब्रिटिश निघून गेल्यावर पेशवाईने लवकरच उचल खाल्ली. संघवाले लपून छपून सत्तेच्या भोवताल राहिले. कॉंग्रेसमध्ये राहून सामाजिक आणि आर्थिक विषमता नष्ट होऊ नये म्हणून त्यांनी षड्यंत्र रचले. त्यामुळे सत्तेच्या लोभासाठी कॉंग्रेसने संघवाल्याना आपल्या खांद्यावर बसवले. तेथून ते पेशवाईचे पुनरागमन कसे होईल ही योजना आखत बसले. मोदींची सत्ता प्रस्थापित झाली तेव्हा ते उघडे पडले. आज दोन क्रूर व्यक्तीचे माध्यमाने संघाने भारतात हुकूमशाही आणून परत बहुजन समाजाला आणि स्त्री जातीला गुलाम केले. गुलामीचे चटके हळू हळू सर्वांना बसत आहेत. म्हणून या गुलामीविरुद्ध जात धर्म, पंथ, पक्ष, भाषा आणि प्रदेश याचा विचार न करता सर्व जागृत लोकांनी स्वातंत्र्याचा लढा सुरू केला पाहिजे. ■ ■

# नजूबाई गावित - साहित्यातील खरी योद्धा!

नजूबाई गावित यांचे नाव भारतीय साहित्यविश्वात आदिवासी जीवनाचा प्रामाणिक, संघर्षशील आणि विद्रोही आवाज म्हणून आदराने घेतले जाते. त्या केवळ प्रतिभासंपन्न साहित्यिका नाहीत, तर वंचित, शोषित, उपेक्षित घटकांसाठी अखंड लढणाऱ्या लढवय्या कार्यकर्त्या आहेत. विशेषतः आदिवासी, भूमिहीन, शेतकरी, धरणग्रस्त आणि कष्टकरी महिलांच्या प्रश्नांशी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जोडले आहे.

नजूबाई गावित यांचा जन्म 10 जानेवारी 1950 रोजी बोद्रीपाडा, तालुका साक्री, जिल्हा धुळे येथे एका भूमिहीन मावची आदिवासी कुटुंबात झाला. दळणवळण, वीज, शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या दुर्गम भागात त्यांचे बालपण गेले. परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे त्यांना केवळ चौथीपर्यंतच शिक्षण घेता आले. लग्नानंतरही दारिद्र्य, कष्ट आणि जबाबदाऱ्यांचे ओझे अधिकच वाढले. मात्र अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा स्वभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा होता.

कॉ. शरद पाटील यांच्या संपर्कात आल्यानंतर नजूबाईंच्या जीवनाला वैचारिक दिशा मिळाली. त्या सत्यशोधक मार्क्सवादी विचारधारेकडे आकृष्ट झाल्या आणि परिवर्तनवादी चळवळीत सक्रियपणे सहभागी झाल्या. 1974 साली त्यांनी धुळे जिल्हा श्रमिक महिला संघाची स्थापना केली आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. पुढे जातीच्या प्रश्नावर मतभेद झाल्याने त्यांनी 1978 साली पक्षाचा राजीनामा देत सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष व सत्यशोधक कष्टकरी महिला सभेची स्थापना केली. नजूबाई गावित यांनी सामाजिक न्यायासाठी अनेक लढ्यांचे नेतृत्व केले. आणीबाणीच्या काळात (1975) त्या स्थानबद्ध झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीत त्यांनी शेकडो महिलांसह सहभाग घेतला. दलित, आदिवासी आणि ग्रामीण संयुक्त साहित्य चळवळीला त्यांनी संघटित स्वरूप दिले. 1986 साली साक्री येथे दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य महासभेची स्थापना केली. अनेक आंदोलनांमुळे त्यांना कारावासही भोगावा लागला. राजकीय पदे, प्रसिद्धी आणि सत्तेपासून दूर राहून त्यांनी चळवळीचे स्वातंत्र्य जपले. 2017 साली नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे भरलेल्या तेराव्या विद्रोही साहित्य व संस्कृती संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी आदिवासी साहित्याबाबत ठाम भूमिका मांडली. आदिवासींचे समग्र जीवन वास्तव स्वरूपात मांडणारे साहित्य म्हणजेच आदिवासी साहित्य, असे त्यांचे मत आहे. मराठी साहित्यांतर्गत आदिवासी साहित्याचा विचार करणे योग्य नाही, कारण मराठी साहित्याचा प्रवाह प्रामुख्याने ब्राह्मणी आहे, अशी त्यांची स्पष्ट आणि परखड भूमिका आहे. नजूबाईंचे साहित्य हे त्यांच्या प्रत्यक्ष जीवनानुभवांचे प्रतिबिंब आहे. आदोर (1995) हे आत्मकथन भारतीय वाङ्मयातील पहिले आदिवासी स्त्री आत्मचरित्र मानले जाते. तृष्णा ही आत्मनिवेदनपर कादंबरी असून मानवी जीवनाची प्रक्रिया त्यांनी आदोर, रोप, रोपणी आणि पोराळी या चार टप्प्यांतून प्रभावीपणे मांडली आहे. भिवा फरारी (2008) ही ऐतिहासिक कादंबरी आदिवासींच्या उपेक्षित इतिहासातील संघर्षाचे सुवर्णपान आहे. ब्रिटिश सत्तेविरुद्ध भिवा आणि त्याच्या पिढ्यांनी दिलेल्या लढ्याचे चित्रण या कादंबरीत आहे. नवसा भिलणीचा एल्गार (2013) हा कथासंग्रह कष्टकरी महिलांना स्त्रीसत्तेचा एल्गार करण्याची प्रेरणा देतो.





श्रीकृष्णदास निरंकारी
मो. 7132796683

नजूबाईंच्या साहित्यात आदिवासी जीवनमूल्ये ठळकपणे उमटतात. निसर्गाशी एकरूपता, प्राणिप्रेम, समूहनिष्ठा, सहकार्य, समता, बंधुता, स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता आणि माणुसकी. आदिवासी समाजातील मातृसत्ताक परंपरा, स्त्री-पुरुष समतेची भावना, पुनर्विवाह, विधवाविवाह, स्त्रीस्वातंत्र्य, लोकपरंपरा आणि लोककला यांचे प्रभावी चित्रण त्यांच्या लेखनात आढळते. मावची बोलीतून मांडलेले अनुभव त्यांच्या साहित्याला जिवंतपणा देतात.

नजूबाई गावित यांचे साहित्य व कार्य वाचकाला केवळ भावनिक करत नाही, तर चिंतनशील आणि विचारप्रवृत्त करते. त्या साहित्यातील खरी योद्धा आहेत. ज्यांनी लेखणीला शस्त्र बनवून अन्यायाविरुद्ध लढा दिला. नजूबाई गावित यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना निरामय, संघर्षशील आणि दीर्घ आयुष्याच्या हार्दिक शुभेच्छा! ■ ■

**काही माणसे जगण्यासाठी जन्माला येतात, तर काही माणसे परिवर्तनाचा इतिहास लिहिण्यासाठी! परिस्थितीला प्रभवाचे पाणी पाजुन ॲड. सचिन शंकर मेकाले हे नाव आज अशाच एका धगधगत्या इतिहासाचे प्रतीक बनले आहे. ज्यांच्या वाट्याला कर्तृत्वाचे आभाळ आले, पण दुर्दैवाने त्याच आभाळात उपेक्षेची काळी किनारही दाटून आली. गेली 15 वर्षे समाजसेवेच्या यज्ञात स्वत:ला झोकून देणाऱ्या या माणसाचा प्रवास म्हणजे समाजाच्या कृतघ्नपणाची आणि एका निष्ठावान आंबेडकरी सैनिकाच्या जिद्दीची ज्वलंत गाथा आहे.**



# समतेच्या वाटेवरचा 'शापित राजहंस' आणि विद्रोही विचारांचा धगधगता वणवा
## ॲड. सचिन मेकाले

**ज्ञानाचे उपासक आणि कृतीशील विचारवंत :-** सचिन मेकाले यांची शैक्षणिक उंची केवळ पदव्यांनी मोजता येणार नाही. विज्ञान शाखेत पदवीधर, पुढे कायद्याची पदवी, कायद्याच्या क्षेत्रात पदव्युत्तर शिक्षण आणि डॉ. आंबेडकर विचारधारा विषयात पदव्युत्तर शिक्षण यासह उपेक्षितांच्या सहित्याचा चिकित्सक अभ्यास एवढा मोठा शैक्षणिक प्रवास. साहित्य आणि कायद्याच्या पदवीचा उपयोग त्यांनी न्यायालयात पैसा कमावण्यासाठी नाही, तर अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी केला. 'स्मृतिशेष शंकर मेकाले प्रतिष्ठान'च्या माध्यमातून त्यांनी समाजाच्या शेवटच्या थरातील मुलांच्या डोळ्यांत शिक्षणाचे स्वप्न पेरले. त्यांच्या लेखणीत एक वेगळीच धार आहे. 'तूच ठरव' हा त्यांचा कवितासंग्रह केवळ शब्दांचा खेळ नाही, तर तो प्रस्थापित मानसिकतेवर केलेला वैचारिक हल्ला आहे.


अतुलराज बेळीकर
मो.7507083796

**महिला सक्षमीकरणाचा नवा आयाम :-** मेकाले सरांचे कार्य केवळ भाषणांपुरते मर्यादित नाही. ज्या समाजात 'मासिक पाळी' हा विषय आजही अस्पृश्य मानला जातो, तिथे त्यांनी स्त्रियांच्या आरोग्यासाठी आणि मासिक पाळी संदर्भात जनजागृतीसाठी रान पेटवले. स्त्रियांच्या अस्मितेचा आणि आरोग्याचा लढा त्यांनी अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने आणि संवेदनशीलतेने घराघरात पोहोचवला. ही कृती त्यांना केवळ एक कार्यकर्ता नाही, तर एक चळवळीचा ईमानदार सैनिक म्हणून सिद्ध करते.

**स्वकीयांचा रोष आणि वैचारिक विद्रोह :-** ॲड. मेकाले यांचा खरा संघर्ष हा बाहेरच्या शत्रूशी नसून 'आतल्या' संकुचित मानसिकतेशी आहे. ज्या मातंग समाजात ते जन्मले, त्याच समाजातील काही घटकांचा रोष त्यांना पत्करावा लागत आहे. डॉ. बाबासाहेबांचा 'समतावादी विचार' आणि बुद्धांची 'करुणा' त्यांनी उरात बाळगली, हेच त्यांच्या उपेक्षेचे मूळ ठरले आहे. 'मातंग असून बुद्ध सांगतो' असे म्हणत ज्यांना आपले मानले, त्यांनीच रितसर त्यांना दूर लोटण्याचे प्रयत्न केलेत. दुसरीकडे, बौद्ध समाजातही त्यांना पूर्णतः स्वीकारताना कचरणाऱ्यांची संख्या कमी नाही. हा दुहेरी संघर्ष पेलताना मेकाले सरांची अवस्था त्या 'शापित राजहंसा' सारखी झाली आहे, जो क्षीर-नीर विवेक जाणतो, पण ज्याला आपल्याच तलावात परके मानले जाते.

**विद्रोही लेखणी आणि क्रांतीची पेरणी :-** विद्रोही लेखक म्हणून ॲड. मेकाले यांची ओळख आता संपूर्ण महाराष्ट्रभर पोहोचत आहे. वज्रमुठीतले हिंदुत्व या त्यांच्या कवितेने तर महाराष्ट्र ढवळून निघाला. थेट जीवे मारण्याच्या धमक्या आल्या. आपल्याच समाजाचा रोष पत्करून, छळाचे चटके सोसूनही हा माणूस थकला नाही. उलट, 'माझा विचार माझ्या समाजाच्या कल्याणासाठी आहे' या ठाम विश्वासाने ते भारतभर प्रबोधन करीत पायपीट करत आहेत. ही विचारांची तळमळ त्यांना गप्प बसू देत नाही. आंबेडकरी चळवळीतील हा असा योद्धा आहे, ज्याच्या एका हातात कायद्याचे पुस्तक आहे, तर दुसऱ्या हातात समतेची लेखणी!

ॲड. सचिन मेकाले यांची कहाणी ही केवळ एका व्यक्तीची व्यथा नाही, तर ती आंबेडकरी चळवळीतील अंतर्गत संघर्षाचे प्रतिबिंब आहे. प्रज्ञावंत आणि चारित्र्यवान नेतृत्व. अगदी तरुण वयात चळवळीत स्वतःला झोकून देऊन चारित्र्यसंपन्न आणि निष्कलंक राहणे हे मोठे अव्हान असते. पण मेकाले सर त्यावर निर्विवाद खरे उतरले आहेत. जेव्हा असा संघर्ष योद्धा आपल्याच लोकांच्या तिरस्काराचा बळी ठरतो, तेव्हा समाजाची मोठी हानी होते. मेकाले सरांसारख्या निष्ठावान कार्यकर्त्याला पाठबळ देणे, हे केवळ त्यांचे कौतुक नाही, तर डॉ. बाबासाहेबांच्या 'समतावादी' चळवळीला बळकट करणे आहे. ते आजही उपेक्षेच्या अंधारात उभे राहून प्रकाशाची गाणी गात आहेत, कारण त्यांच्या रक्तात डॉ. बाबासाहेबांचा स्वाभिमान आणि बुद्धांचे धैर्य आहे. आंबेडकरी चळवळीतील या शापित राजहंसाचा सन्मान करणे, हे एका न्याय्य समाजाचे कर्तव्य आहे! या मापक अपेक्षेसह या संघर्षयोद्ध्यास वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा...! ■ ■

# टिम वर्क : चला समूहाने पुढे जाऊ या !

**मानव हा मुळातच सामाजिक प्राणी आहे. तो एकटा राहू शकतो, पण एकटा प्रगती करू शकत नाही. समाजात जगताना माणसाला कुटुंब, शेजार, संस्था, कार्यालय, संघटना यांचा आधार घ्यावा लागतो. या सर्व ठिकाणी एक गोष्ट समान असते, ती म्हणजे टीम वर्क किंवा संघकार्य.**

विचार चांगला असतो, पण अनेकदा अंमलबजावणी होत नाही. 'मी' पणाला बाजूला ठेवून पाहा, यश नक्कीच येते. स्वार्थी माणूस काही काळ पुढे जाऊ शकतो; पण काही दिवसांनंतर तो थांबून जातो. खऱ्या अर्थाने पुढे जायचे असेल, तर सर्वांना सोबत घेऊन चालावे लागते. 'एकट्याने चालता येते, पण एकत्र चालल्यास दूरवर जाता येते,' हे वाक्य संघकार्याचे महत्त्व अधोरेखित करते. असे अनेकदा म्हटले जाते की मागासवर्गीय, उपेक्षित, वंचित समाज फार काळ एकत्र राहू शकत नाही; त्यांच्या संघटना व संस्था लवकरच गट-तटात मोडतात. हे काही अंशी खरे असले, तरी त्यागी व समर्पित नेतृत्वाखाली काही संस्था आजही टिकून आहेत, हेही तितकेच सत्य आहे. कामात पारदर्शकता असेल, तर लोक नक्कीच सहकार्य करतात. त्रिरत्न बौद्ध महासंघ, करूणा भवन पेशंटस् असोसिएशन (अभ्यंकर नगर), डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंजिनिअर्स असोसिएशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेडिकल असोसिएशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे प्रतिष्ठान, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती (दीक्षाभूमी, नागपूर), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी बँक (नागपूर), वंदना संघ (दीक्षाभूमी), बहुजन हिताय संघ (लष्करीबाग), धम्मसंगोष्टी (मनीष नगर) अशा अनेक संस्था आजच्या स्पर्धात्मक, वेगवान व गुंतागुंतीच्या युगात टीम वर्कमुळेच पुढे आहेत. हे यश जवळजवळ शक्य झाले आहे. जुने जाणते, ज्येष्ठ सहकारी यांच्या सहवासातून नवे नेतृत्व घडत असते. म्हणूनच टीम वर्क ही काळाची गरज आहे. राग, द्वेष, मत्सर, अहंकार, उच्च-नीच भाव, हेवा, या सर्व विनाशकारी व संघकार्याला घातक प्रवृत्ती आहेत. आयुष्य फार कमी आहे. आपल्या आयुष्यात चांगले कार्य करता येत असेल, तर ते नक्कीच केले पाहिजे. तरच या वेगवान काळात टिकून राहता येईल, हे लक्षात ठेवले पाहिजे. टीम वर्क म्हणजे समान उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वेगवेगळ्या क्षमतांचे, कौशल्यांचे व विचारांचे लोक एकत्र येऊन समन्वयाने काम करणे. संघातील प्रत्येक सदस्याचे योगदान महत्त्वाचे असते. येथे 'मी'पेक्षा 'आपण' या भावनेला प्राधान्य दिले जाते. संघकार्य म्हणजे केवळ कामाचे विभाजन नव्हे, तर जबाबदारीची वाटणी, परस्पर विश्वास, सहकार्य आणि सामूहिक यशाची भावना होय.

**टीम वर्कचे ऐतिहासिक महत्त्व :-** इतिहासाकडे पाहिले तर मोठमोठ्या क्रांती, लढाया व सामाजिक चळवळी संघकार्याच्या बळावरच यशस्वी झाल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य मावळ्यांच्या संघकार्यामुळे




उभे राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनासाठी केलेले कार्यही सहकाऱ्यांच्या संघटित प्रयत्नांतूनच शक्य झाले. स्वातंत्र्यलढ्यात गांधीजी, नेहरू, पटेल, सुभाषचंद्र बोस यांच्यासह लाखो कार्यकर्ते एकत्र आले, म्हणूनच भारत स्वतंत्र झाला. खरे तर टीम वर्कमुळे कामाची गुणवत्ता वाढते. अनेक लोकांच्या कल्पना, अनुभव व कौशल्ये एकत्र आल्याने काम अधिक प्रभावी होते. वेळेची बचत होते, कारण योग्य कामवाटपामुळे कमी वेळेत मोठी उद्दिष्टे साध्य होतात. जबाबदारीचे ओझे एकट्यावर न राहता सर्वांवर विभागले जाते. नवीन कल्पनांना वाव मिळतो, परस्पर विश्वास वाढतो आणि नेतृत्वगुण विकसित होतात.

**कार्यालयीन व व्यावसायिक क्षेत्रातील टीम वर्क :-** आज कोणताही उद्योग, कंपनी किंवा कार्यालय संघकार्याशिवाय चालू शकत नाही. उत्पादन, विपणन, व्यवस्थापन, वित्त, मानव संसाधन, हे सर्व विभाग परस्परांवर अवलंबून असतात. एका विभागातील चूक संपूर्ण संस्थेला नुकसान पोहोचवू शकते. त्यामुळे टीम स्पिरिट फार महत्त्वाची ठरते.

खेळाच्या क्षेत्रात टीम वर्कचे महत्त्व विशेषत्वाने दिसून येते. क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, कबड्डी यांसारख्या खेळांमध्ये एकही खेळाडू एकट्याने सामना जिंकू शकत नाही. भारतीय क्रिकेट संघाचे यश हे खेळाडू, प्रशिक्षक, व्यवस्थापन व सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या संघकार्याचे फलित आहे. येथे प्रत्येकाची भूमिका वेगळी असली, तरी उद्दिष्ट एकच असते, विजय.



विलास गजभिये
मो. 9421588901

**सामाजिक जीवनातील टीम वर्क :-** स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता यांसारख्या समस्या एकट्या व्यक्तीने सोडवता येत नाहीत. त्यासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक असतात. स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते व युवक संघटनांच्या माध्यमातून संघकार्य घडते. स्वच्छ भारत अभियान, जलसंधारण, वृक्षारोपण यांसारखे उपक्रम संघकार्यामुळेच यशस्वी होत आहेत.

**टीम वर्कसाठी आवश्यक गुण :-** यशस्वी संघकार्याकरिता स्पष्ट व सकारात्मक संवाद, परस्पर आदर, जबाबदारीची जाणीव, लवचिकता, संयम, सहनशीलता, नेतृत्व व अनुशासन हे गुण आवश्यक असतात.

**टीम वर्कमधील अडचणी :-** संघकार्य करताना मतभेद, अहंकार, संवादाचा अभाव, जबाबदारी टाळण्याची वृत्ती, दोषारोप अशा अडचणी येतात. मात्र योग्य नेतृत्व, खुला संवाद व सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास या अडचणींवर मात करता येते.

**आधुनिक काळातील टीम वर्क :-** डिजिटल युगात टीम वर्कचे स्वरूप बदलले आहे. ऑनलाइन मीटिंग्स, वर्क फ्रॉम होम, आभासी टीम्समुळे जगभरातील लोक एकत्र काम करत आहेत. तंत्रज्ञानामुळे संवाद सुलभ झाला असला, तरी मानवी संवेदनशीलता व विश्वास टिकवणे तितकेच महत्त्वाचे आहे. आधुनिक काळात स्मार्ट टीम वर्क हीच यशाची खरी गुरुकिल्ली ठरली आहे.

**निष्कर्ष :** टीम वर्क हे केवळ काम करण्याचे साधन नसून, जीवन जगण्याचे तत्त्व आहे. संघकार्यामुळे व्यक्तीपेक्षा समाज, संस्थेपेक्षा राष्ट्र मजबूत होते. वैयक्तिक यश तात्पुरते असते; पण संघाच्या बळावर मिळवलेले यश दीर्घकाळ टिकते. म्हणूनच 'मी काय मिळवतो?' यापेक्षा 'आपण काय साध्य करतो?' असा विचार केला पाहिजे. संघकार्य हीच खरी शक्ती आहे आणि तीच उज्ज्वल भविष्याची हमी आहे. ■ ■

# पुष्पांजली

## संघर्षाच्या बीजातून उमललेले आंबेडकरवादी आईचे स्वकथन

आई कुणाचीही असो, तिच्या मायेच्या कुशीत अखवे विश्व सामावलेले असते. आई या शब्दातच ममतेची तहान आहे. मायेच्या प्रेमाची पाखर आहे आणि कोमेजलेल्या मनांना जीवनबळ देणारा तो एक आधारवड आहे. आईची थोरवी सांगण्यासाठी शब्दांचा खजिना ही अपुरा ठरेल. मनात उठणारे वादळ आईच्या मांडीवर डोके ठेवले की अगदी शांत होते. संकटात असताना आईचा प्रेमळ हात डोक्यावरून फिरला की मनाला अपूर्व शांती मिळते. आईच्या प्रेमाला व्यवहाराची तुलना मान्य नसते. प्रत्येक आई आपल्या मुलांना सुसंस्कारित करत असते. तिची मुलांकडून फक्त एकच अपेक्षा असते, ती म्हणजे आपली मुले मानाने, गुणाने व पराक्रमाने मोठी व्हावीत. जगातील सर्व पराक्रम आईच्या कुशीतच जन्म घेतात. आई हा शब्द कोणी शिकवावा लागत नाही, तो सहजच तोंडातून बाहेर पडतो. चालताना पायाला ठेच लागली तरी तोंडातून आई हा शब्द बाहेर पडतो. तर असे हे हृदयाच्या मखमली पेटीत जपून ठेवण्यासारखे दोन शब्द आहेत आणि ते म्हणजे 'आई.'




'आंबेडकरवादी आई' म्हणजे फक्त ममता देणारी माता नाही, तर विचार घडवणारी, प्रश्न विचारायला शिकवणारी आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद देणारी स्त्री असते. तिची भूमिका फक्त घरापुरती मर्यादित नसते, तर समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेतील ती एक सक्रिय घटक असते. आंबेडकरवादी आई मुलांमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही संविधानिक मूल्ये पेरते. ती जात, लिंग, धर्म, भाषा यावर आधारित भेदभाव नाकारून माणसाला माणूस म्हणून पाहण्यास शिकवते. शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवणारी ती असते आणि विज्ञाननिष्ठा व आत्मसन्मान विकसित होईल असे शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणारी ती असते. ती अंधश्रद्धा, परंपरेतील अन्यायकारक रूढी, स्त्री-दलित-दबलेल्यांवरील अत्याचार यांविषयी 'का?' असा प्रश्न विचारायला शिकवते. अन्याय सहन न करता विरोध करणे हे नैतिक कर्तव्य आहे, हे ती बिंबवते आणि पुष्पांजली हे स्वकथन वाचताना वाचक या सर्व गोष्टींशी आपोआप जोडला जातो आणि आपल्या स्वतःच्या आईशी या आईची तुलना करायला लागतो. अनेकदा साम्यता जाणवते आणि बोध होतो. स्वकथन हा साहित्यप्रकार केवळ व्यक्तीच्या जीवनाची हकीकत सांगणारा नसतो, तर समाजव्यवस्थेतील अन्याय, शोषण आणि विषमतेचे वास्तव उघड करणारा प्रभावी माध्यम असतो. आंबेडकरवादी दृष्टिकोनातून पाहिल्यास स्वकथन हे आत्मकेंद्रित न राहता सामाजिक परिवर्तनाचे साधन ठरते. आंबेडकरवादी स्वकथनात लेखक आपल्या वैयक्तिक अनुभवांद्वारे जातीय अत्याचार, बहिष्कार, अपमान आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यांची स्पष्ट मांडणी करतो. येथे 'मी' हा शब्द एका व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही, तर तो संपूर्ण दलित-बहुजन समाजाचा आवाज बनतो. त्यामुळे हे स्वकथन केवळ भावनिक न राहता एक सामाजिक दस्तऐवज बनते.

पुष्पांजली या स्वकथनाचे लेखक डॉ. के. पी. वासनिक आपले मनोगत व्यक्त करताना लिहितात, 'संघर्ष, मेहनत, मूल्य आणि प्रामाणिकता यांतून उभे राहिलेले माझ्या आईचे आयुष्य पुढील पिढ्यांसाठी एक प्रकाशस्तंभ ठरेल. जेव्हा केव्हा जीवनाचा अंधार जाणवेल, मार्ग दिसेनासा होईल तेव्हा हे पुस्तक वाचताना पुन्हा उभे राहण्याची ताकद देईल, असा माझा ठाम विश्वास आहे.' लेखक इतका मोठा आशावाद का व्यक्त करतात? कारण हे एका आंबेडकरवादी आईचे स्वकथन आहे. आंबेडकरवादी स्वकथन हे एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यापुरते मर्यादित राहत नाही, तर ते समाजव्यवस्थेतील विषमता, जातीय अन्याय, बहिष्कार उघड करते आणि त्या व्यक्तीचा अनुभव हा सामूहिक वेदनेचा आवाज बनतो. आंबेडकरवादी दृष्टिकोनातील स्वकथन म्हणजे केवळ स्वतःच्या जीवनाची गोष्ट सांगणे नव्हे, तर जात, वर्ग, लिंग, शोषण, संघर्ष आणि आत्मसन्मान यांच्या चौकटीतून स्वतःचे अनुभव मांडणे होय. हे स्वकथन 'मी कोण आहे?' या प्रश्नाइतकेच 'मला असे का व्हावे लागले?' या व्यवस्थेला आणि 'या व्यवस्थेला बदलायचे कसे?' या प्रश्नांची उत्तरे शोधणारे असते. आंबेडकरवादी स्वकथनात लाचारी नाही, दैववाद नाही, सहनशीलतेचे उदात्तीकरण नाही; त्याऐवजी बंड, प्रश्न, आत्मसन्मान आणि परिवर्तनाची जाणीव असते. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार केंद्रस्थानी असतात. त्यामुळे हे स्वकथन वैचारिक दिशा देते आणि अनुभवाला विचारांची धार मिळते. डॉ. के. पी. वासनिक आपल्या मनोगतात लिहितात, 'पाच वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या प्रकल्पात मी आणि आई वेळ मिळेल तेव्हा एकत्र बसून तिचे बालपण, शिक्षण, तिचा संसार, तिचे संघर्ष यावर संवाद साधत असू. अनेकदा मी प्रश्न विचारण्याआधीच ती जुन्या काळात हरवून जाई आणि क्षणभर तिचा आवाज थरथरत असे. कधी कधी ती भावूक होऊन रडू लागे तेव्हा मी संवाद थांबवत असे. पुन्हा कधीतरी तिचा मूड चांगला असला की तिच्या आयुष्याचे नवे पैलू उलगडत जात. या सर्व संवादाची नोंद मी एका विशेष नोंदवहीत करत असे. ती नोंदवही आज आईच्या श्वासांनी, तिच्या ओलसर डोळ्यांनी आणि आमच्या संवादाची साक्ष म्हणून मी जपून ठेवली आहे.' पुढील पिढ्यांपर्यंत आईचा प्रकाश पोहोचावा, तिचे कार्यकर्तृत्व पोहोचावे या दृष्टीने लेखकाने स्वकथनाच्या माध्यमातून पुष्पांजली या पुस्तकात मांडलेला स्वानुभव खरोखरच अद्भुत आहे. हे स्वकथन वाचत असताना आईचा संपूर्ण जीवनपट हळूहळू पुढे सरकत जातो. सामाजिकतेची जाणीव असलेली मीराबाई हळूहळू मोठी होते आणि वयाच्या 17व्या वर्षी प्रल्हाद वासनिक यांच्या जीवनात त्यांची सहचारिणी म्हणून प्रवेश करते. लग्नानंतर नाव बदलून मीराबाई पुष्पाताई या नावाने वावरतात. लग्नानंतरही कौटुंबिक जबाबदारी बरोबरच सामाजिक भान जपणाऱ्या पुष्पाताई. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात म्हणून धानला गावातील महिलांना 'भिसी' काढण्यास प्रवृत्त करणाऱ्या पुष्पाताई. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि भगवान बुद्धांची जयंती पुढाकार घेऊन साजरी करणाऱ्या पुष्पाताई. पंचशील ध्वज फडकावणाऱ्या पुष्पाताई. एका कुणबी कुटूंबातील त्या गेल्या असता त्यांना शेराने (शेर-धान्य मापन करण्याचे भांडे) पाणी पिण्यास दिले तेव्हा त्यांनी ते पिण्यास नकार दिला. सामाजिकता इतकी की गावातील स्त्रियांना एकत्र करून त्यांच्या श्रमदानातून आणि छोट्या छोट्या देणग्यांतून दहा लाख रुपयांचा सुंदर बौद्ध विहार उभा करणाऱ्या पुष्पाताई. 2023 मध्ये त्या बौद्ध विहारात गावातील महिलांनी पुष्पाताईंचा वाढदिवस साजरा केला. तो माझ्या आयुष्यातील आनंदाचा क्षण होता, असे उद्गार पुष्पाताई व्यक्त करतात. पती प्रल्हाद वासनिक यांना संघर्षाच्या काळात भावनिक, मानसिक आधार देणाऱ्या पुष्पाताई आपल्या पतीबद्दल विचार व्यक्त करताना लिहितात, 'त्यांच्या चिकाटी, संयम आणि अखंड कष्टामुळेच आम्ही आयुष्यात शिक्षण, आर्थिक स्थैर्य, सामाजिक संबंध आणि कुटुंब या सर्व बाबतीत संतुलित प्रगती करू शकलो. आज आम्ही जे काही आहेत, ते त्यांच्या दूरदृष्टी, प्रेम आणि परिश्रमांमुळेच.' 'आयुष्यभर इतरांसाठी जगलेल्या या स्त्री ने शेवटी काहीच मागितले नाही. फक्त 'मी येईल' असे म्हणत निघून गेली आणि त्या खरंच परतल्या, पण आता आठवणीच्या रूपात. सुगंधी फुलासारख्या आमच्या प्रत्येक श्वासात विरघळलेल्या...' या शब्दात आईची सुन ज्योत्स्ना वासनिक आपल्या सासूबाईबद्दल लिहितात. पुष्पाताईंनी सहा मुलांचा सांभाळ करणे, त्यांना घडविणे, त्यांना योग्य वळण लावणे आणि धानला या गावावरून नागपूरला शिकवण्यासाठी पाठविणे आणि त्यांना योग्य माणूस बनविणे हे सर्व कार्य चोखपणे केले. आईने तिच्या तिन्ही मुलींना (निर्मला, प्रमिला, वंदना) सासरी पाठवताना संसार करण्याची शिकवण दिली. दयाकर वासनिक, नातीन ऐश्वर्या वासनिक या नातलगांच्या मनात निर्माण झालेला असीम कळवळा दुसऱ्या भागात अशाप्रकारे प्रतिबिंबित झालेला आहे. या स्वकथनात आईने गायलेली आणि आईला तोंडपाठ असलेली अनेक गाणी आहेत, 27 डिसेंबर 2024 रोजी नागपूरच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात वयाच्या 87व्या वर्षी पुष्पाताईंनी शेवटचा निरोप घेतला. या पुस्तकातील अर्पणपत्रिकेत डॉ. के. पी. वासनिक लिहितात, 'आई कधीही मरत नाही. ती आठवणींमध्ये, संस्कारांमध्ये आणि आपल्या श्वासात सदैव जिवंत असते.' या स्वकथनाला समर्पक अशी प्रस्तावना डॉ. अनिल सूर्या यांनी लिहिलेली आहे. यात डॉ. अनिल सूर्या म्हणतात, 'पुष्पांजली हे स्वकथन केवळ एका स्त्रीचे स्वकथन नसून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडविलेल्या एका जागृत, संघर्षमयी, विज्ञानमयी आणि भारतीय संविधानमयी प्रवृत्तीचे समूहात्मक प्रतिनिधित्व करणारे हे स्वकथन आहे.'



सरिता सातारडे
मो. 8308853051

समाजकार्य करतानाचा संघर्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली धम्मक्रांती, त्यामुळे झालेले सामाजिक परिवर्तन, जातीयतेचा सोसलेला छळ आणि त्याला दिलेले चोख प्रत्युत्तर, पतीच्या निधनानंतरही न डगमगता धैर्याने येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाणारी आणि आपल्या संपूर्ण कुटुंबाचा आधारवड बनणारी ही आंबेडकरी आई आपल्या सर्वांच्या गळ्यातील ताईत व्हावी अशीच आहे. ■ ■

'पुष्पांजली'
(संघर्षमय जीवनाची प्रेरक कहाणी - पुष्पा वासनिक यांचे स्वकथन).
आराध्या प्रकाशन, नागपूर
शब्दांकन - डॉ. के. पी. वासनिक
किंमत - 375/-



## काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

बहुजन सौरभ

### जनक जय भिमच

चळवळीत ओतलाय,
जीव लाऊनी तन मन
जयभिमचे जनक तुम्ही
बाबू हरदास एल. एन.
भीमाच्या चळवळीचे
तुम्ही सरदार नेक झाले
लढ्यास भीम बाच्या
नवक्रांतीचे रूप आले
जय भिमचा गुंजे नारा
पेटविल्या त्या मशाली
गर्वाने बोलतो समाज
जय भिम हा खुशाली
भीमाचे शूर शिपायी
तुम्ही..होते बाणेदार
झोकून...दिले तेव्हा
चळवळीला ..घरदार
क्रांतीची ....पेटवली
ज्योत तुम्हीच सर्वत्र
'महार'..काढलेत
तुम्ही ते ....वृत्त पत्र
खांद्यास लाऊन खांदा
कार्य ....भीमाचे केले
अल्पायु ...मध्ये तुम्ही
सोडून.....आम्हा गेले
उपेक्षीत आहे आज
केलेले...तुमचे कार्य
अनुयायी तुमचे पण
नाही सोडणार धैर्य
पुढारी....करीत आहे
कार्याची....वाताहात
विसरून चळवळीला
गटा ..गटाने राहतात
जोवरी चमकती..तारे
जयभिमचा गुंजे नारा
दबणार....नाही कधी
भीमाचा भीम सितारा.
जोडूनी.... कर माझे
वंदीतो ....नायकाला
ऊर्जा ......करा प्रदान
या भीमाच्या पाईकाला

- सुभाष मानवटकर

### असा एक मित्र असावा

मित्र असा असावा मित्रासारखा
नको नुसताच देखावा
सुखदुःखात धावून यावा
आनंद समय वाटून घ्यावा... 1..
मनाचे हितगुज समजून घ्यावे
अडचणीत त्याने हात द्यावे
नको जुन्या उजळणी उगळयव्या
चेहऱ्यावरचा भाव जाणून घ्यावा...2...
मित्रांनी काळोखात दीपस्तंभ व्हावे
चुका एकमेकांच्या विसरून जावे
भेटता हास्याचे ताटवे फुलावे
प्रेमाने एकमेका आलिंगन द्यावे..3...
जुण्या आठवणीला उजाळणी द्यावे
गप्पांत त्या मग्न व्हावे,
मित्र सवे मन मोकळे करून घ्यावे
आनंदाला उधाण यावे,.. 4..
असा एक मित्र असावा

- इंजि. शुद्धोधन बडवणे, (नि)

### अबोला

नको हा अबोला निष्ठूर जीवघेणा,
मन आज वाटे जणू कैदखाना.
समजून घे जरा अबोल वेदनांना,
मन आज वाटे जणू कैदखाना.

संवादा विना शब्द झाले निवांत,
मन जाळतो गजबजला एकांत,
अनबन मनाची सजा भावनांना
मन आज वाटे जणू कैदखाना.

कशाचे मनी हे धूके दाटलेले,
मनाचे मनाशी कां झरे आटलेले
निवारा दे मनाच्या पंख पाखरांना
मन आज वाटे जणू कैदखाना

इथेच राहील हा धन द्रव्य पैसा,
कुणी जाणीला सूर्य उद्याचा कैसा,
अल्पायुषी आयुष्य रोज वेचतांना
मन आज वाटे जणू कैदखाना.

ये हातात हात या सांजवेळी,
सोंगे झाले फार रात उरली थोडी.
देह हा दिसावा लोचणे मिटतांना
मन आज वाटे जणू कैदखाना.

- चित्तरंजन चौरे

### काठी...

लहानपणी बाबाचं बोट पकडून
चालायचो
चालता चालता बोट सोडून
दुडूदुडू धावायचो
धावता धावता
पडायचो
बाबा धावत येऊन
मला उचलायचे
छातीशी धरायचे
मी पडलेल्या जागेवर
थुंकत लाथ मारायचे
मी पुन्हा त्यांचं बोट
पकडून चालायचो
चालता चालता
बोट सोडून धावायचो
धावता धावता पडायचो
बाबा मला उचलून
छातीशी धरायचे...
काल बाजारातून येत असताना
卐 गोल्डन मूठ 卐 असलेली
काठी घेवून आलो
त्यांना देत म्हणालो,
卐 बाबा तुमच्यासाठी 卐
त्यांनी एक कटाक्ष
काठीवर टाकला
नि, मजकडे पाहत म्हणाले,
卐 काय रं, तूझं बोट तुटलं का ?
मी गहिवरलो
काठी दूर भिरकावली
त्यांना छातीशी धरत म्हणालो,
बाबा, आय लव यू!

- संजय गोडघाटे

### करू नको अभिमान

गर्व कशाला माणसा
निस्वार्थ जीवन जगून घे
माणुसकीने जगण्याची
रीत माणसा शिकून घे

जाण असू दे माणुसपणाची
माणुसकीला विसरू नको
रंगीन या दुनियेत तू
भान हरपून वागू नको

गर्व, अहंकार, लोभाने
देहास तू नासवू नको
मोल आहे माणुसकीला
माणसा तू विसरू नको

माणुसकीच्या वाटेवर
माणसा तू चालून घे
माणुसकीला मोल किती
इतिहासात पाहून घे

सुनंदा भगत, नांदेड

### बाप उमगेना कधी

बाबा सांगायच्या होत्या
काही मनाच्या भावना
कोरोनाने झाला मृत्यू
दुःख हृदयी मावेना
तुम्ही माझे कल्पतरू
मन वाचणारा बाप
एक आदर्श नायक
प्रेम करती अमाप
आई रागवली कधी
घेती जवळ ओढून
कन्या माझी गुणवान
जाई माहेर सोडून
नसे बहिण मजला
राखी बांधते हसत
केले काय पुण्य असे
पिता लेकींचाच मस्त
लग्न मनाने बाबांच्या
दिल्या घरात नांदते
सुख किती अश्रूंनीच
फोटो स्मृतींना बांधते
जगा नियमाने पोरी
हवा जीवनी संयम
काव्य स्फुरे ऐकण्यास
नाही हर्ष बापासम
कोणा वदू आता बाबा
पत्र म्हणू कवितेला
हरवले बालपण
देते आधार मातेला

- डॉ. शील बागडे

# माणूसपण हरवत चाललेल्या नात्याचे अधोरेखन करणारे नाटक : 'बाप रे बाप'

तिकीकरणाच्या या काळात भारतीय संस्कृतीत आमुलाग्र स्वरूपाचे बदल जाणवू लागले आहेत. संयुक्त कुटुंबपद्धती आता नावापुरती शिल्लक राहिलेली आहे. भौतिक सुखासाठी तरुण पिढी आपल्या कुटुंबाचे शोषण करू लागली आहे. भारतीय लोकांचे जीवनमान विलक्षण गतीने बदलू लागले आहे. खानपान राहणीमान आणि उच्चभ्रू व्यवस्थेशी बरोबरी करण्यातून असंख्य सामाजिक आणि कौटुंबिक प्रश्न अनेक प्राणी गिळून सुस्तावलेल्या महाकाय अजगरासारखे फुगत चालले आहेत. जगण्याची अर्थपूर्णतःच माणूस हरवून बसला आहे. दिखाऊ बेगडी प्रवृत्तींची प्रचंड उलाढाल सोन्याच्या किंमतीसारखी भयंकर वाढताना दिसत आहे. अशा पार्श्वभूमीवर लेखक, दिग्दर्शक आणि रंगकर्मी प्रा. सदानंद बोरकर यांचे 'बाप रे बाप' हे नाटक प्रत्येक कुटुंबांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे वाटते. श्री. व्यंकटेश नाट्य मंडळ नवरगाव यांची 'बाप रे बाप' ही अप्रतिम कलाकृती सन्मित्र नाट्यमंडळ यांच्या सौजन्याने जवळून अनुभवण्याचा लाखनीमध्ये सुयोग आला. 'आत्महत्या', 'माझं कुंकू मीच पुसलं', 'नवरे झाले बावरे', 'गंगा जमुना' आणि 'बाप रे बाप' अशा दहा सामाजिक विषयांवरील नाटकातून प्रा. सदानंद बोरकर यांनी रसिकांच्या हृदयावर आणि काळजावर आपले नाव कोरले आहे. आशय-विषयाची जबरदस्त मांडणी, वर्तमानकालीन प्रश्नांचे भावगम्य सादरीकरण, कसदार, दमदार अभिनयाच्या पात्रांचे एकत्रीकरण, प्रभावी संवाद आणि उच्च कोटीच्या विनोदाचे उपयोजन, समुचित संगीत, गीत, नृत्य संयोजन, पार्श्वगायन आणि नेपथ्याचा थाट, छाया, प्रकाश, ध्वनी योजनेचे तथा रंगमंच निर्मितीचे, वेशभूषा रंगभूषा अशा सर्वच बाबींचे अप्रतिम समावेशन अशा साऱ्या बाबींच्या एकत्रीकरणाच्या मेळातून अत्यंत दर्जेदार कलाकृती रंगभूमीवरून प्रस्तुत करण्याचा प्रा. सदानंद बोरकर यांना प्रचंड अनुभव आहे. लाखनी येथे दि. 27 डिसेंबर 2025 रोजी या बाबीचा प्रत्येय 'बाप रे बाप'मध्ये पहावयास मिळाला. 'बाप रे बाप' - या नाटकाविषयी :- या नाटकात प्रसाद सातपुतेंचे एक भन्नाट कुटुंब पहावयास मिळते. कुटुंबात प्रचंड दुःख असूनही हसत-खेळत जीवन जगणारे शासकीय नोकरीतील मध्यमवर्गीय प्रसाद सातपुते पहिली पत्नी प्रभा मरण पावल्यानंतर दुसरे लग्न करतात. वत्सला




नावाची अवदसा त्यांच्या जीवनात येते आणि दुःखाच्या तीव्रतेत भर पडत जाते. मात्र हसतमुखाने दुःखाच्या डोंगराला पेलण्याचे सामर्थ्य असणारा प्रसाद आपल्यासकट इतरांनाही सुखाचाच प्रसाद वाटण्याचा कायम प्रयत्न करीत असतो. प्रभा नावाच्या पहिल्या पत्नीचा मुलगा प्रकाश आणि त्याची पत्नी रमा दोघेही सुसंस्कारित, समंजस, शालीन आणि सुस्वभावी तर दुसऱ्या बायकोचा, वत्सलाचा मुलगा इंद्रनील हा स्वार्थी, बेरोजगार, उनाड आणि संस्कारहीन अगदी वच्छलीचेच डीएनए घेऊन जन्मलेला! सावत्रपणातून घरात रोज निर्माण होणारे पराकोटीचे भांडण याही नाटकात पाहावयास मिळते. मात्र ते हलक्यात घेत सहनशीलतेचा परिचय देत प्रसाद सातपुते विनोद करीत हसतखेळत कुटुंबाचा गाडा पुढे ढकलत ढकलत नेतात. सतत प्रेक्षकांना हसवत ठेवणे, गंभीर विषय मांडूनही रसिकांना खेळवत ठेवणे हे अवघड काम पेलण्याचे सामर्थ्य या लेखकामध्ये आहे. घरात वत्सलाची लहान बहीण बबली अत्यंत खट्याळ आणि बावळट असणारी, एकप्रकारे दत्तक म्हणूनच सातपुते यांच्या घरात राहते. ती अविवाहित असून बहीण आणि बहीणलेकाच्या चक्रव्युहात अडकून राहते. डॉ. सुळे हे सातपुते यांचे खास जिवलग मित्र तर बबलू हा त्यांचा पहिल्या बायकोच्या नात्यातला आतेभाऊ, हे दोघेही सातपुतेंवर विलक्षण प्रेम करणारे! डॉ. सूळ्याचेच प्रभाबरोबर लग्न होणार असते. परंतु सरकारी नोकरी नाही म्हणून प्रसादच्या गळ्यात प्रभाची वरमाला पडते. परंतु डॉ. सूळ्याच्या मनात प्रभाबद्दलचा कायम आदर राहतो. सातपुते तर प्रभावरून डॉ. सूळ्याची सतत गंमत करीत राहतो. इंद्रनील काही कामधंदा करीत नाही. परंतु ठाकरेंच्या सोनी नावाच्या मुलीच्या प्रेमात पडतो. त्याला तिच्याशी विवाह करायचा असतो. मात्र नोकरी, पैसा नसण्यातून आणि सरकारी नोकरी प्राप्त करण्याच्या अभिलाषेतून एक भन्नाट कल्पना इंद्रनीलच्या मनात येते. आपला बाप मरावा आणि अनुकंपातून त्याला नोकरी मिळावी ही ती जीवघेणी कल्पना तो आपल्या आईला सांगतो. मावशीलाही सांगतो आणि मग ते तिघेही भयानक कट रचतात. परंतु नंतर या गटात बबली नसते. ती आपल्या दाजीला त्या कटाची कल्पना देते. आतड्याचा कॅन्सर झाल्याचे सातपुते डॉ. सुळे, बबलू यांच्या मदतीने नाटक रचतात. रसिकांना याची काहीही कल्पना नसते. बबलीही त्यांना साथ देते. परंतु तिचे डाव शेवटपर्यंत रसिकांना कळत नाहीत. वाढदिवसाच्या दिवशी इंद्रनील आपल्या बापाला विष असलेला चॉकलेट देतो. त्यांना रक्ताची उलटी येते. लगेच दवाखान्यात त्यांना नेले जाते. ते त्यातून बरे होतात. इंद्रनीलाला पश्चाताप होतो. तो आपल्या आईला यासाठी जबाबदार धरतो. तिचा जीव घेण्याचाही प्रयत्न करतो. परंतु प्रकाश आपल्या आईला वाचवतो. पोलीस तपासात सातपुते कुटुंबाला सहीसलामत ठेवतो. कधी गंभीर तर कधी हसतखेळत वळण घेत रसिकांना मंत्रमुग्ध करणारे द्वंद्व नाटक विलक्षण भावस्पर्शी असून अनुकंपावर बापाची नोकरी लागावी म्हणून बापाचा जीव घेण्याची लालसा अधोरेखित करणारे हे नाटक समाजातील कुटुंब व्यवस्थेतील बेगडी प्रवृत्तींचा समाचार घेणारे असे आहे. नाटकात त्यांच्या घरातील नोकर चमन याचे विनोदी पात्र पाहावयास मिळते. मात्र त्याची भूमिका फारच छोटी आहे. शेवट सुखावह होतो. बबलू आणि बबली यांना सातपुते लग्नाच्या बेडीत अडकवतात. सतत तीन तास प्रेक्षक रसिकांना खेळवून ठेवण्यात हे नाटक यशस्वी झाले आहे. सतत रसिकांच्या ओठी 'बाप रे बाप' हे विस्मयजनक वाक्ये येत राहते. खळखळून हसवणारे भन्नाट निखालस विनोद, साधी, सोपी भाषा मर्मस्पर्शी संवाद, अतिशयोक्तीचा अभाव, रसपूर्ण सौंदर्यवेधक शैली, रसिकांना तन्मय करण्याची ताकद असणारे कथानक, त्याचे उत्कृष्ट सादरीकरण, कर्णमधुर संगीत, प्रसादपूर्ण शीर्षक गीत, आतील गीते, खटकेबाज संवाद, ठसठशीत व्यक्तिचित्रे, कसदार अभिनय, हृदयाला हात घालणारे त्यातील करूण प्रसंग, लालीत्यपूर्ण शब्दयोजना, खेळकर आणि खोडकर पात्रांचे स्वभाववैशिष्ट्ये अशा अनेक गोष्टींमुळे 'बाप रे बाप' प्रत्येकच रसिकांच्या ओठावर नाटकभर रेंगाळत राहिले. प्रा. सदानंद बोरकर, पूजा पिंपळकर, कमलाकर कामडी, आसावरी रामेकर, देवयानी जोशी, अजीज पाशा, कौशल जोशी, पराग सहारे आणि राहुल बोरकर यांच्या दमदार अभिनयाने 'बाप रे बाप' लाखनीवासीयांच्या हृदयावर कायम ठसा उमटवून गेले. सर्व कलावंत आणि तांत्रिक सहायकांना मनापासून शुभेच्छा! ■ ■

**समीक्षा**



दिनेश कोटांगले
मो.9834492541

प्रा. डॉ. सुरेश खोब्रागडे
मो.9373711432





स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -५६

## शेतकऱ्याचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा

यवतमाळ पासुन 18 किलोमिटर अंतरावर आर्णी रोडवरिल हिवरी या गावी 'जेतवन प्रतिष्ठा' निसर्ग रम्य वातावरण मध्यमे असुन मोठे बुद्ध विहार विपस्सना केंद्र,अभ्यासिका, विविध प्रकारच्या बुद्ध मुद्रा आपल्याला पाहायला मिळतात. पांढ्या संगमरवर दगडाचा वापर करून ज्ञानपिपासु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सर्वाचे आकर्षण खेचुन घेतो. प्रत्येक रविवारला भेटी दरम्यान लोक एकत्र वंदन करतात. विद्यार्थ्यांना नेहमी प्रेरणा देतो.

संवाद मित्र, भीमराव म्हैस्कर
मो.9764410363

### नवी दिल्लीच्या जंतर मंतर वर केंद्र सरकारच्या खाजगीकरण आणि कामगारविरोधी धोरणांविरुद्ध

# स्वतंत्र मजदूर युनियन तर्फे देशव्यापी धरणे निदर्शने

**नागपूर :** स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. एस. पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र मजदूर युनियन तर्फे 5 जानेवारी 2026 रोजी नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे देशव्यापी धरणे आंदोलन संपन्न झाले. या आंदोलनात देशातील सर्व राज्यातील 92 संलग्न संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण थांबवणे, वीज दुरुस्ती विधेयक-2025 मागे घेणे आणि कामगार संहितेतील कामगारविरोधी धोरणे रद्द करणे या प्रमुख मागण्यांसह जूनी पेन्शन योजना लागू करणे, पदोन्नतीमधील आरक्षण लागू करणे, किमान वेतनात वाढ करून अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स यांना वेतनश्रेणी लागू करणे, सफाई कामगारांना स्थायी पदावर सामावून घेणे इत्यादी प्रमुख मागण्यांचा समावेश होता.




यापसंगी आपले अध्यक्षीय भाषणात जे. एस. पाटील म्हणाले, स्वातंत्र्यानंतर, भारताने स्वतःला एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक घोषित केले आणि समाजवादी शासन व्यवस्था स्वीकारली, भारतीय संविधानाच्या निर्मात्यांचा हेतू भारताला एक कल्याणकारी राज्य म्हणून स्थापित करण्याचा होता. एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून सामाजिक-आर्थिक समानता स्थापित करण्याचा होता. म्हणूनच सरकारी धोरणे आणि त्यांची अंमलबजावणी भारतीय समाजातील सर्व घटकांमध्ये सामाजिक-आर्थिक संतुलन राखण्यासाठी केली पाहिजे. भारतीय संविधानाचे उद्दिष्ट केवळ राजकीय न्याय सुनिश्चित करणे नाही तर सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात सर्व भारतीय नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करणे आहे, असेही ते म्हणाले.

कल्याणकारी राज्याची संवैधानिक संकल्पना काही मूलभूत सुविधा प्रदान करण्यापुरती मर्यादित असू शकत नाही, म्हणूनच, सरकारी मालकीच्या उद्योगांचे खाजगीकरण केवळ असंविधानिकच नाही तर देशाच्या मुळ धोरणांच्या विरुद्ध देखील आहे, असे मत राष्ट्रीय अध्यक्ष जे. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

खाजगीकरण हे मागासवर्गीय नागरिकांना आणि भारतीय समाजातील कमकुवत घटकांना संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे आणि किमान रोजगाराच्या हमीचे उल्लंघन करणारे आहे. म्हणूनच स्वतंत्र मजदूर यूनियन सरकारी मालकीच्या मूलभूत आणि प्रमुख उद्योगांचे खाजगीकरण करण्याच्या धोरणाचा तीव्र विरोध करणे आवश्यक आहे.

आरक्षण धोरण सामाजिक-आर्थिक समानता तसेच कायद्यासमोर समानतेची हमी देते. तथापि खाजगीकरण आणि निर्गुंतवणूकीचे धोरण संधीच्या समानतेच्या मूलभूत तत्त्वाच्या विरुद्ध असल्याने, आमचा सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करण्याच्या असंवैधानिक धोरणास तिव्र विरोध असल्याचेही ते म्हणाले.

घटनात्मक आरक्षण हे 'गरिबी निर्मूलन' कार्यक्रम म्हणून नाही, तर समाजातील सर्व घटकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आहे, ज्यामध्ये पदोन्नतीतील आरक्षणाचा समावेश आहे. तथापि, 2012 पासून, पदोन्नतीतील आरक्षणावर बंदी घालण्यात आल्यामुळे केंद्र आणि राज्य दोन्ही अधिकारक्षेत्रात उच्च पदांवर अनुसूचित जाती/जमाती कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व पूर्णपणे संपुष्टात आले आहे. या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित याचिका अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. परंतु या याचिका निकाली काढण्यासाठी सरकारने आजपर्यंत कोणताही पुढाकार घेतलेला नाही.

जुनी पेन्शन मिळण्याचा अधिकार हा सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि एनपीएस किंवा यूपीएस कर्मचाऱ्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवते हे सिद्ध झाले आहे, असेही ते म्हणाले.

यापसंगी के. पी. स्वामीनाथन (तामिळनाडू), मुकेश जाटव (दिल्ली), विकास गौर (नागपूर), महेश चंद्रा (उत्तरप्रदेश), दिनेश निंबरिया (हरियाणा), संजय घोडके (पूणे), सागर तायडे (मुंबई), इंद्र राज मीना (राजस्थान), एस. के. सचदेव (जबलपुर), विजेंदर ब्रार (हरियाणा), जितेंद्र सिंग (पंजाब), अशोक अज्ञानी (दिल्ली), संदीप गायकवाड (पूणे), किशन बनकर (गुजरात), सुरेखा अथरगडे (चंद्रपूर) यांनीही आपले विचार व्यक्त केले.

या धरणे आंदोलनाचे प्रास्ताविक नरेंद्र जारोंडे यांनी केले. संचालन दिनेश बोरकर यांनी तर आभार प्रदर्शन गणेश ऊके यांनी केले.



## पत्रकारितेत सुवर्णपदक विजेती प्राची ठाकरेचा बहुजन सौरभने केला गौरव

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर येथील जनसंवाद विभागात प्रथम क्रमांक पटकावत प्राची वामन ठाकरे हिला तीन सुवर्णपदक आणि दोन पारितोषिके प्राप्त झाले. विद्यापीठाच्या 113 व्या दीक्षांत समारोहात प्राचीला सन्मानित केले. दैनिक बहुजन सौरभ आणि ॲट पोस्ट मराठीच्या वतीन प्राचीचा सत्कार केला. प्राची वामन ठाकरे हिने जनसंवाद विभागातून पत्रकारितेची पदवी संपादन केली. यात अव्वल स्थान पटकावत तिने तीन सुवर्णपदके प्राप्त केले. प्राचीला अनंत गोपाळ शेवडे सुवर्णपदक, तारा धर्माधिकारी सुवर्णपदक, प्रकाश शंकरराव देशपांडे सुवर्णपदक प्रदान केले. सोबतच दोन पारितोषिके प्रदान करून सन्मानित केले. प्राची सध्या ॲट पोस्ट मराठी या चॅनलमध्ये उपसंपादक पदावर कार्यरत आहे. तिच्या यशाबद्दल दैनिक बहुजन सौरभचे मुख्य संपादक ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबळे यांच्या हस्ते प्राचीचा सत्कार केला . यावेळी निवासी संपादक संध्या राजूरकर, कार्यकारी संपादक विलास गजभिये, संचालक भंते नागदीपंकर, प्रा भीमराव गायकवाड, डॉ. चंद्रमणी कांबळे, डॉ. सुर्यकांता पाटील, ज्योसना बनसोड, प्रिती तिरपुडे, पंकज पाटील, गौरव मानकर, तृषीला मानकर आदि सह परिवर्तन विचार मंचाचे सदस्य उपस्थित होते.

# पालिभाषा व ऑनलाईन धम्मलिपी वर्गाचे प्रमाणपत्र वितरण

**नागपूर :** बुद्धविहार समन्वय समितीच्या वतीने आयोजित पालिभाषा प्रचार परीक्षेतील विद्यार्थ्यांना तसेच भारतीय बौद्ध महासभा आयोजित बीएसआय (क्रस्द्ध) चैत्यभूमी ऑनलाईन धम्मलिपी ग्रूपच्या विद्यार्थ्यांना शिवराजनगर बुद्धविहार येथे दि. 4 जानेवारी 2026 रोजी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शिवराजनगर बुद्धविहार येथे पालिभाषा व धम्मलिपी वर्ग करुणा धर्मपाल मून यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येतो. या वर्गांतर्गत विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण केल्याने त्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आली. पहिल्या परीक्षेत प्रथम योजना भगत, द्वितीय साधना सूर्यवंशी, तृतीय उज्वला मनवर व सुनिता गायकवाड यांनी यश संपादन केले. दुसऱ्या परीक्षेत प्रथम शितल सारीपुत्त, द्वितीय कविता शेंडे, तृतीय मंगला गाणार व अस्मिता शेंडे यांनी क्रमांक पटकावले. दोन्ही परीक्षांतील सर्वच विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. संघमित्रा बाभळे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी आपली भाषा, संस्कृती व बौद्ध तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी पालिभाषा व धम्मलिपीचे शिक्षण अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्रा. निलीमा गजभिये यांनी पालिभाषेचे महत्त्व, बुद्ध वचनांचे जतन व संरक्षण तसेच विविध सुत्तांचे तात्त्विक महत्त्व विशद केले. अध्यक्षीय भाषणात प्रमिला



आकोडे यांनी शिवराजनगर बुद्धविहाराच्या कार्याची माहिती दिली.

यावेळी करुणा मून यांनी भारतीय बौद्ध महासभा आयोजित बीएसआय ऑनलाईन चैत्यभूमी धम्मलिपी वर्गाच्या उपक्रमांविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन प्रियदर्शिनी कांबळे यांनी केले तर आभार वंदना बुचुंडे यांनी मानले.

कार्यक्रमाला प्रमिला आकोडे, सत्यभामा नगरारे, दुपटे, गाणार, अस्मिता शेंडे, प्रतिक्षा लोहकरे, ॲड. संघमित्रा बाभळे, रंजना गणवीर, मेघा रंगारी, वंदना बुचुंडे, आभिलाषा धनविजय, वनिता कांबळे, साधना सूर्यवंशी, जोत्स्ना वनकर, कोमल गवळी, शितल सारीपुत्त, पूर्वा गजभिये, दर्शना मोडक, वैशाली भगत, विभा साव, अनिता ढोले, निरंजना फुलझेले, विधी शंभरकर, रश्मी धनविजय, उज्वला मनवर, माया सुटे, साधना सूर्यवंशी, सुनिता गायकवाड, योजना भगत तसेच शिवराजनगर बुद्धविहार येथील उपासिका, धम्मलिपी वर्गातील विद्यार्थिनी व संडे धम्म क्लासचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काँग्रेस-भाजप उमेदवारांकडून रिपाइंच्या झेंड्याचा गैरवापर

### निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार

**नागपूर :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) रिपाइं या पक्षाची कुणाशीही युती किंवा आघाडी झाली नसताना काँग्रेस भाजपच्या अनेक उमेदवारांकडून प्रचारात रिपाइं पक्षाच्या अधिकृत ध्वजाचा वापर केला जात असल्याची बाब निर्दशनास आणून देत विभागाकडे रिपाइंने निवडणूक संबंधितांविरुद्ध आचारसंहिता भंगाची लेखी तक्रार केली आहे.

रिपाइंचे महासचिव महेश रजतगवळी यांनी नेहरूनगर झोन व आसीनगरझोन येथे ही तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत म्हटले आहे की, 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' या पक्षाच्या घटनेतील भाग तीन कलम 22 (1) प्रमाणे अशोक चक्रांकित निळा रंग असलेला ध्वज हा पक्षाचा अधिकृत ध्वज असून याबाबत पक्षाने मुख्य निवडणूक अधिकारी तथा नागपूर महानगरपालिका आयुक्त यांना 24 डिसेंबर 2025 रोजी पत्राद्वारे कळविले होते. तसेच त्याचा कुणीही गैरवापर करू नये, अशी ताकीद दिली होती. त्यावर 29 डिसेंबर 2025 रोजी आचारसंहिता कक्ष प्रमुख नागपूर महानगरपालिका यांच्यातर्फे स्पष्ट सूचित करण्यात आले की कोणताही राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्तीने 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' पदाधिकाऱ्यांच्या या पक्षातील परवानगीशिवाय येणाऱ्या निवडणुकीत ध्वजाचा गैरवापर करून निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन करू नये, तसे केल्यास त्याबाबतची तक्रार संबंधित झोनचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे करावी. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची नागपूर महानगरपालिकेत कोणत्याही पक्षासोबत आघाडी, युती झालेली नाही तरी देखील कांग्रेस व भारतीय जनता पक्षासह विविध राजकीय पक्ष व अपक्ष

## महत्वाचे

### भारतीय बौद्ध महासभे तर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना आदरांजली

**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा नागपूर शहर, विदर्भ प्रदेश व महिला विंग तर्फे आयोजित कॉटन मार्केट नागपूर मधील सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी विदर्भ प्रदेश अध्यक्ष अनिल कुमार मेश्राम, महासचिव राजकुमार वंजारी, शहर अध्यक्ष मिलिंद डांगे. शहर उपाध्यक्ष हरिदास बेलेकर, रुपदास गेडाम, मृणालिनी दहिवाडे, महासचिव मनोहर उके. कोषाध्यक्ष हरिदास नागदिवे, उत्तर विभाग अध्यक्ष गोपीचंद अंभोरे, पुर्व विभाग महासचिव जासुंद पाटील, पश्चिम महासचिव सिटी जांगळे, महिला विंग अल्का चौकीकर, वर्षा सहारे, मणिषा जामगडे, ताराबाई मेश्राम, इंदिरा सोनागोते, अस्मिता देशभ्रतार, उषा मेश्राम, भारती पाणतावने, नलीनी मेश्राम, गुंफा भगत, माया मोहाडे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.




### नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालयात क्रांतीज्योती सावित्रीआई फुले जयंती साजरी

**कुरखेडा :** दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालय देऊळगाव (खरमतटोला) येथे भारत देशाच्या आद्य शिक्षिका, ज्ञानदायिनी क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या शुभ प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष संतोष ठलाल, सदस्य निर्मला ठलाल, तनुजा लाडे, लिला गोरटकर, विकास खुणे, मालू मुर्वतकार, सुरज गोरटकर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांनी क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. उपस्थित मान्यवरांनी क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांना अभिवादन केले.



## सम्यक बहुउद्देशीय संस्था, विपश्यना केंद्र सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**नागपूर :** त्रिमूर्तीनगर येथील सम्यक बहुउद्देशीय संस्था संचालित विपश्यना केंद्रात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आणि सामूहिक वंदनेने झाली. कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून अर्चना बडोले आणि साधना ईटले उपस्थित होत्या. संस्थेचे सचिव दामोदर वाहाणे यांनीही आपले विचार मांडले. पुष्पा लोखंडे यांनी सुंदर आवाजात गीत सादर करून वातावरण भारावून टाकले. त्यानंतर स्मिता मेश्राम यांनी सावित्रीबाईची वेशभूषा करून त्यांच्या जीवनावर आधारित एक हृदयस्पर्शी नाटिका सादर केली, ज्याने उपस्थितांचे मनोभाव जिंकले. कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे उपाध्यक्ष कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रिती गजघाटे यांनी केले. कार्यक्रमाच्या संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी बी. डी. बोरकर यांनी पार पाडली. अल्पोहारानंतर धम्म पालन गाथेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# सावित्रीबाई फुले जयंती साजरी

## सावित्रीबाई फुले यांच्या कार्याने प्रेरित बालिका दिन साजरा

**नागपूर :** उच्च प्राथमिक शाळा, शिवनी येथे सावित्रीबाई फुले जयंती आणि बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या आवडत्या स्वयंपाकी कमला सोनबावणे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पार्पण करून झाली. त्यांनी सावित्रीमाईच्या कार्याला नमन केले. या प्रसंगी रजनीगंधा वंजारी यांनी बालिका दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले यांनी जोतीराव फुले यांच्या सहकार्याने मुलींसाठी पहिली शाळा स्थापन करून स्त्री शिक्षणाचा पाया रचला. अनुज हुलके



यांनी त्या काळातील फुले दांपत्यांच्या संघर्षाची भावपूर्ण माहिती दिली. कार्यक्रमात वक्त्यांनी सांगितले की, सावित्रीबाईंनी समाजातील स्त्रियांच्या शिक्षणाविषयी असलेल्या चुकीच्या समजुती मोडून काढल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज स्त्रिया सर्व क्षेत्रात पुरुषांसमान यश संपादन करत आहेत. स्त्री शिक्षणामुळे समाजाचे संपूर्ण रूप पालटले असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी मोठ्या उत्साहाने कार्यक्रमात सहभागी झाले. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या शिक्षकवृंदाने केले व शेवटी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या विचारांनी प्रेरित राहण्याचा संकल्प घेतला.

## तुकूम येथे सावित्रीबाई फुले सेवा पुरस्कार वितरण व पाच महिलांचा सन्मान

**चंद्रपूर :** महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रेरणेने क्रांतीज्योती सावित्रीबाईंनी पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाचा पाया घातला आणि विधवा, दलित, शोषित महिलांसाठी शिक्षणांची सोय करून दिली. त्या खऱ्या अर्थाने स्त्री



मुक्तीच्या अग्रदूत आहेत, असे प्रतिपादन डॉ. प्रभा वासाडे यांनी केले. राष्ट्रसंत विचार साहित्य परिषद केंद्रीय समितीद्वारा आयोजित श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या द्वारकानगरीतील सामुदायिक प्रार्थना मंदिरात झालेल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रभा वासाडे, माजी मुख्याध्यापिका सीमा अडबाले, श्रीगुरुदेव सेवा मंडळ तुकूमचे अध्यक्ष अनमुलवार उपस्थित होते. यावेळी वच्छलाबाई मंगरूळकर स्मृती सावित्रीबाई फुले सेवा पुरस्कार योग शिक्षिका छाया मायकलवर, सेवा मंडळ संघटिका उर्मिला पारधी (घुग्घुस), संगीत क्षेत्रातील रश्मी हिवरे यांना तर स्व. पार्वताबाई खानेकर स्मृती सावित्रीबाई फुले सेवा पुरस्कार महिला संघटन कार्यासाठी अर्पणा चिडे आणि महिला सुरक्षा कार्यासाठी सीमा चटारे यांना अतिथींच्या हस्ते वितरित करण्यात आले. प्रास्ताविक रोहिणी मंगरूळकर यांनी केले. संचालन ग्रामगीताचार्य प्रा. नामदेव मोरे यांनी तर आभारप्रदर्शन मंजूषा खानेकर यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी डॉ. धर्मा गावंडे, धारणे, प्रेमलाल पारधी आदी सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

### वेणूताई कृष्णराव जिंदे

**नागपूर :** वर्धा येथील सामाजिक शैक्षणिक आणि धार्मिक कार्यकर्त्या वेणूताई कृष्णराव जिंदे (वय 85) यांचे बुधवार, 7 जानेवारी 2026 रोजी अल्पशा आजाराने नागपूर येथे निधन झाले. राष्ट्रभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था वर्धाचे संस्थापक सचिव कृष्णराव जिंदे यांच्या त्या पत्नी होत्या. संस्थेकडून अजिंठा महाविद्यालय शाळा, दोन छात्रावास आणि एक टायपिंग इन्स्टिट्यूट स्थापन करून समाजोद्धाराचे भरीव कार्य करण्यात आले.1999 ला कृष्णराव जिंदे यांच्या निधनानंतरही त्या सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत राहिल्या. त्यांच्या निधनाने वर्धा येथील शोक कळा पसरलेली आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगी, चार मुले, सुना व नातवंडे, पणनातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्यविधी मूळ गावी वर्धा येथे झाली.



### किर्तीकांत मधुकर गजभिये

**नागपूर :** किर्तीकांत गजभिये, शासकीय मेडिकल कॉलेज येथे समुपदेश म्हणून नोकरी, शिक्षण, एम.एस.डब्ल्यू.(सोशल वर्क), राहणार चंद्रमणी नगर गल्ली नं.8 आर, नागपूर, यांचे 5 जानेवारी 2026 ला सकाळी 9 वाजता निधन झाले. त्यांच्यावर मोक्षधाम घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यापश्चात आई-वडिल, दोन भाऊ, पत्नी व एक मुलगा आहे.



### महेंद्र देविदास नगरारे

**नागपूर :** प्लॉट नंबर 56, शिल्प सोसायटी, मनीष नगर, नागपूर महेंद्र देविदास नगरारे यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आल्यामुळे निधन झाले. सोनेगाव स्मशानभूमी येथे अंतिम संस्कार करण्यात आले.



## शिकलेल्या लोकांनी अंधश्रद्धा व कर्मकांड सोडले तरच सावित्रीमाई फुले यांना खरे अभिवादन - हरिदास बेलेकर



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा, नागपूर पूर्व यांच्या वतीने गिड्डोबा नगर येथील प्रज्ञा शिल बुद्ध विहार येथे क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात हरिदास बेलेकर यांनी 'शिकलेल्या लोकांनी अंधश्रद्धा व कर्मकांड सोडले तरच ते सावित्रीमाई फुले यांना खरे अभिवादन ठरेल,' असे स्पष्ट मत व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, आजची स्त्री अनेकदा कर्मकांड आणि स्वार्थी भूमिकेत अडकलेली दिसते. ही स्थिती बदलली, तरच समाजाचा खरा विकास होऊ शकतो. या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून विदर्भ प्रदेश उपाध्यक्षा रमा वासनिक यांनी सावित्रीमाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी केलेल्या त्यागपूर्ण कार्यावर आणि त्यांच्या ऐतिहासिक योगदानावर सविस्तर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विदर्भ प्रदेश महासचिव राजकुमार वंजारी यांनी केले. यावेळी ज्ञानदेव गजभिये यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन जासुंद पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन आशा मेश्राम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कुंदा हुमने, शिला मेश्राम, ज्योती शिंपी, माला मेढेंकर, वाघमारे, बागडे तसेच फुलझेले यांनी सहकार्य केले.

## फातिमा शेख आणि धम्मदुत प्रा. ॲड. भदंन्त सिवलीबोधी यांना अभिवादन



**नागपूर :** समता सैनिक दल आणि जयभीम प्रवर्तक लोकप्रिय बाबू हरदास एल एन स्मृती समिती यांच्या वतीने पिपळा फाटा शंभरकर सेलिब्रेशन लॉनजवळ हुडकेश्वर रोड, नागपूर येथे हरदास एल एन स्मृती पंधरवडा अंतर्गत नववे पुष्प गुंफले गेले.

उपरोक्त कार्यक्रमाला संबोधित करताना भदंन्त नाग दिपंकर महास्थविर यांनी भीमाकोरेगाव महासंग्राम स्मृती दिन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे स्मृती व देवाजी भीवाजी खोबरागडे जन्मोत्सव क्रांती उर्जा सावित्री बाई फुले जयंती 1946 च्या मुंबईच्या आंदोलन तिल शहिदांना श्रद्धांजली साहित्य वाचस्पती डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन जन्म दिवस जयभीम घोषणा दिन जयभीम प्रवर्तक लोकप्रिय बाबू हरदास एल एन जन्म दिवस 1946 च्या नागपूर येथील शहिदाना श्रद्धांजली आंतरराष्ट्रीय धम्म ध्वज दिन आणि आज पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका फातिमा शेख जयंती व भदंन्त सिवलीबोधी स्मृती दिन संपन्न होत आहे. या निमित्त मार्गदर्शन करत होते. ते म्हणाले की, पुर्वोत्तर इतिहास वर्तमान विषम काळात जनसामान्य लोकांच्या मनात रुजवण्याचे कार्य अत्यंत महत्वाचे असून पुर्वोत्तर मार्गदर्शक तत्वे जपण्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले.

या प्रसंगी समता सैनिक दलचे नागपूर जिल्हा जि ओ सी प्रमोद खांडेकर नागपूर डिव्हिजनचे सचिव जयंता सहारे, नागपूर जिल्हा महिला अधिकारी प्रतिभा खेडकर, शांताबाई कांबळे, जासुंदा मेश्राम, सुनिता पानतावने, सुमन मेश्राम, वर्षा मेश्राम, अनुराधा भिमटे, संजू निचळे, ललिता श्यामकुवर, जयश्री मुगले, उषा पिल्लेवान, शिल्पा मकेश्वर, रेखा बागडे, सोनाली भगत, करुणा मडके, मंदा शंभरकर, पद्मा बहादुरे, अनिता मेश्राम, मंदा खरतड आदी महिला अधिकारी उपस्थित होत्या.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648